म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.

# …जलाञ्जलि

REFBK-0004931
REFBK-0004931

माधव जूलियन्

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०८८
ता. ९-१२-३३

ग्रंथ संग्रहालय
नं. ६०१६

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणे.

# गज्जलाञ्जलि

★

★ ★

REFBK-0004931

★

ठाणे
४८३७

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

१ **किरण** ( गद्यपद्य, मण्डळ ) ०४

२ **काव्यविचार** ( काव्यविषयक निवन्ध, मण्डळ ) १

३ **उषा** ( पद्य, मण्डळ ) ०१२

४ **मधुमाधव** ( पद्य, घाटे–माधव जूलियन् ) ०१२

५ **शलाका** ( गद्यपद्य, मण्डळ ) १

६ **विरहतरङ्ग** ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) ०८

७ **कला** ( खण्डकाव्य, गिरीश ) ०६

८ **नाट्यरूप महाराष्ट्र** (ऐतिहासिक प्रवेश,विठ्ठलराव घाटे) १

९ **छन्दोरचना** (मराठी वृत्तशास्त्र, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन) २

१० **प्रभा** ( गद्यपद्य, मण्डळ ) ०८

११ **सुधारक** ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) १०४

१२ **आम्बराई** ( खण्डकाव्य, गिरीश ) १

१३ **यशोधन** ( पद्य, यशवन्त ) १०८

१४ **उमरखय्यामच्या रुबाया**(पद्य,प्रो.मा.त्रिं.पटवर्धन) १०८

१५ **भावमन्थन** ( पद्य, यशवन्त ) ०८

१६ **काञ्चनगङ्गा** ( पद्य, गिरीश ) १०८

१७ **द्राक्षकन्या** ( पद्य, माधव जूलियन् ) ०१२

१८ **बन्दीशाळा** ( पद्य, यशवन्त ) १०८

१९ **गज्जलाञ्जलि** ( पद्य, माधव–जूलियन) १

पत्ताः–**आर्यसंस्कृति मुद्रणालय,** टिळक रस्ता, पुणें २.

**परचुरे पुराणिक आणि मं., मुम्बई ४**

रविकिरणमण्डळाचें १९ वें पुस्तक

# गज्जलाञ्जलि

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ग्रं. ........ नं. ..........
ता. ........ ....
ठा णे.

माधव जूलियन्

काव्य-
८०९ गज्जलांजली

पुणें

आर्यसंस्कृति-मुद्रणालय

१९३३

किम्मत १ रुपया

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | **किरण** ( गद्यपद्य, मण्डळ ) | ऽ४ |
| २ | **काव्यविचार** ( काव्यविषयक निवन्ध, मण्डळ ) | १ |
| ३ | **उषा** ( पद्य, मण्डळ ) | ऽ१२ |
| ४ | **मधुमाधव** ( पद्य, घाटे–माधव जूलियन् ) | ऽ१२ |
| ५ | **शलाका** ( गद्यपद्य, मण्डळ ) | १ |
| ६ | **विरहतरङ्ग** ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) | ऽ८ |
| ७ | **कला** ( खण्डकाव्य, गिरीश ) | ऽ६ |
| ८ | **नाट्यरूप महाराष्ट्र** (ऐतिहासिक प्रवेश,विठ्ठलराव घाटे) | १ |
| ९ | **छन्दोरचना** (मराठी वृत्तशास्त्र, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन) | २ |
| १० | **प्रभा** ( गद्यपद्य, मण्डळ ) | ऽ८ |
| ११ | **सुधारक** ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) | १ऽ४ |
| १२ | **आम्बराई** ( खण्डकाव्य, गिरीश ) | १ |
| १३ | **यशोधन** ( पद्य, यशवन्त ) | १ऽ८ |
| १४ | **उमरखय्यामच्या रुबाया**(पद्य,प्रो.मा.त्रिं.पटवर्धन) | १ऽ८ |
| १५ | **भावमन्थन** ( पद्य, यशवन्त ) | ऽ८ |
| १६ | **काञ्चनगङ्गा** ( पद्य, गिरीश ) | १ऽ८ |
| १७ | **द्राक्षकन्या** ( पद्य, माधव जूलियन् ) | ऽ१२ |
| १८ | **बन्दीशाळा** ( पद्य, यशवन्त ) | [illegible] |

काव्य-
९०९

रविकिरणमण्डळाचें १९ वें पुस्तक

# गज्जलाञ्जलि

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
ता. ........

माधव जूलियन्



पुणें

आर्यसंस्कृति-मुद्रणालय

१९३३

किम्मत १ रुपया

# माधव-जूलियन्कृत काव्यें

## १ सुधारक

....त्यांचा हातगुणच असा दिसतो की, त्यांच्या कृतींत कृत्रिमतेनेहि स्वाभाविकतेचा साज चढवावा आणि स्वभावानेहि अलङ्काराचा नटवेपणा नटवावा...." **बाळकृष्ण अनंत भिडे** ( वि. विस्तार ५९।६-७-८-९ ).

## २ विरहतरङ्ग

"काव्यांत वर्णिलेले प्रसङ्ग असामान्य नसले तरी काव्यात्मक आहेत. व वर्णन खरोखरच बरेंच मार्मिक, सूक्ष्मदर्शी व मधुर आहे" **वामन मल्हार जोशी** ( वि. विस्तार ५८।६ ).

## ३ द्राक्षकन्या

अेड्वर्ड फिज्जेरल्डकृत 'रुबाइयात् ऑफ् ओमर् खय्याम् ऑफ् नैशापूर' या अिङ्ग्रजी काव्याचें भाषान्तर, मूळ अिङ्ग्रजीसह.

---

# प्रो. पटवर्धनकृत पुस्तकें

## १ फार्शी-मराठी कोश

फार्सीच्या द्वारा मराठींत आलेल्या इस्लामी शब्दांचा तौलनिक दृष्टीने केलेला सोदाहरण कोश. प्रस्तावनेसह पृष्ठसङ्ख्या ३४६ किम्मत रु. ४

## २ छन्दोरचना

संशोधनदृष्ट्या सर्व वृत्तांचा शास्त्रीय परामर्श घेणारें अेकच पुस्तक. "राजवाडे यांनी नवी करामत करून दाखविली असतांहि पटवर्धन यांनी त्यांच्यावर ताण केली आहे...ग्रन्थ जसा विवेचक तसाच सुरसही झाला आहे" **न. चिं. केळकर** पुस्तक-परीक्षण, केसरी १३-९-१९२७. किं. रु. २

## ३ उमर-खय्यामकृत रुबाया

### मूळ फार्सीवरून भाषान्तर

"कोणत्याहि इङ्ग्रजी पद्यभाषान्तरापेक्षा हें भाषान्तर मूळाला अधिक धरून झालें आहे" पुस्तकपरीक्षण, केसरी ता. २३-११-१९२९. किं. रु. १॥

ग्रंथ संग्रहालय
स्वच्छ प्रत


प्रिय

**वि. घा.**

यांस

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.
अनुमतीवांचून कोणी अेखादी कविता प्रसिद्ध केल्यास कायदेशीर
अिलाज करण्यांत येअील.

मुद्रक व प्रकाशक
**लक्ष्मण नारायण चापेकर,**
**"आर्यसंस्कृति-मुद्रणालय"**
**टिळकरस्ता, १९८।१७, पुणें २.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# प्रस्तावना

गज्जल हा अेक गायनाचा प्रकार वाटतो; मूलतः हा पद्यप्रकार आहे. हा मूळचा अरबी आहे; पण मराठीचा त्याच्याशी परिचय अुर्दू पदांच्या द्वारा झाला आहे. या गज्जल-वृत्तांपैकी काही थोडीं, उदाहरणार्थ, त्रोटक, भुजङ्गप्रयात, पञ्चचामर, गीतिका अित्यादि संस्कृतांतहि आढळतात. अक्षरशः पहातां हीं वृत्तें, अष्टमात्रिक (पहा अनुक्रमाङ्क १–६), सप्तमात्रिक (७–५१), षण्मात्रिक (५२–१००), पञ्चमात्रिक (१०१–१०७) व चतुर्मात्रिक (१०८) अशा आवर्तनांचीं असतात; आणि म्हणून गज्जल हे त्याच्या अनुरोधाने दीपचन्दी, तेवरा, दादरा, झपताल व केरवा या तालांत गाअिले जावेत. पण कवालीचें विशेष प्राबल्य आढळतें. कवाली म्हणजे केरवा तालाचाच अेक विशिष्ट ढङ्ग होय. अक्षरशः पहातां भिन्न तालांत बसणारा गज्जल, गवअी म्हणतांना मात्रा जुळवून घेअून कवालींत म्हणतात[1]. गज्जलाचे सर्व चरण वृत्तदृष्ट्या सारखे असतात. परन्तु 'अगोट० सारख्या षण्मात्रिकआवर्तन वृत्ताच्या गज्जलातील पहिली द्विपदी कवालींत म्हटल्यावर पुढील द्विपदींतील विषम चरण दादऱ्यांत म्हणतात आणि समचरण पुन्हा पहिल्या द्विपदीशीं म्हणजे ध्रुवपदाशीं जुळेल अशा रीतीने कवालींत म्हणतात. कित्येकदा, पहिली द्विपदी अेखाद्या विशिष्ट चालीवर म्हटल्यानन्तर दुसऱ्याच अेखाद्या, भिन्न वृत्ताच्या व भिन्न मात्रावर्तनाच्या काव्यांतील काही भाग अन्तऱ्याप्रमाणे 'चाल बदलून' म्हणण्यांत येतो, उदा० चुटका[2] १०८ वा पहा. यासच शेर (अरबी शिअर् = काव्य)

---

१ गायनतालाच्या फसवणुकीमुळेच [ । ⏑ – – – । ⏑ – – – । ⏑ – – – । ⏑ – – – ] या वृत्ताच्या चालीवर लिहायला घेतलेला 'असे पति देवचि ललनांना०' हा गज्जल (?) वस्तुतः [ अु । प । + ] या अुपचन्द्रकान्त जातीचा झाला आहे.

२ म्हणूनच "असे काळाचि जी भगिनी न जाणे कोण या भुवनीं" या मूकनायकांतील सप्तमात्रिक आवर्तनाच्या ध्रुवपदापुढील चरण चन्द्रकान्त

म्हणतात. साहजिकपणेंच अन्त-याचे वेळीं ठेका निराळा धरितात अथवा बन्दच ठेवतात; आणि मग 'पहिल्या चाली' चा चरण आला की मूळ ठेका चालू होतो. गज्जलगायन हें विशेष ठेकेबाज असतें. गज्जल शुद्ध रागांत बहुशः गात नाहीत. काफी, खमाज, पिलू, माण्ड व तदितर जिल्हे वा मिश्रराग हे गज्जलास योग्य होत. गज्जल-वृत्तांत यति साङ्गितलेले नाहीत. ज्या गणाच्या पुनरुक्तीने वृत्त सिद्ध होतें त्या गणाच्या प्रत्येक आवर्तनाच्या अन्तीं यति आहे असें मानणें तर साफ चुकीचें आहे. परन्तु दोन गणांनन्तर आणि जेथे चरणाचे तन्तोतन्त सारखे दोन विभाग पड-तात तेथे, विरामाला अवधि असो वा नसो पण यति पाळण्यांत येतो. गज्जल हा अक्षरशः तालबद्ध असल्यामुळे त्यांत स्वरविस्ताराला वाव चिजे-इतका मिळूं शकत नाही. शिवाय, चाल साधी असल्यामुळे तिचें सहज अनुकरण होऊं शकतें. यासाठीच की काय, शास्त्रनिष्ठ गवयांना गज्जल गायन हें किर्लोस्करी व देवली पद्यसङ्गीताप्रमाणे हलक्या दर्जाचें वाटतें.

तथापि गज्जलगायनांत अेक प्रकारचा चटकदारपणा आहे; आणि म्हणूनच प्राचीन कवींत मोरोपन्त[३] व आधुनिक सङ्गीत नाटककारांत किर्लोस्कर,[४] वासुदेव नारायण डोङ्गरे[५], श्रीपाद कृष्ण कोल्हटकर[६], शिवराम

---

जातीचे म्हणजे अष्टमात्रिक आवर्तनाचे रचण्यांत आले असावेत. २ चुटका १०८ च्या चालीसाठी हिझ मास्टर्स व्हॉअिस कम्पनीची मिस दुलारीनें गाअिलेली, मेरा दिल तो दीवाना जां तेरे लिये (P.10589) ही तबकडी पहा

३ पद्य ज्या वृत्तांत आहे त्या वृत्ताचा गज्जलाञ्जलीत जो चुटका आहे त्याचा अनुक्रमाङ्क पद्यापुढील कंसांत दिला आहे. 'हृदया बरें विचारीं'०, (८७) 'रसने न राघवाच्या'० (८७) सूरा-रामायण (२३).


४ 'प्रीतीस पात्र'० (९५) सौभद्र., 'केलीस अशी काय परीक्षा'० (५८) शाकुन्तल.

५ 'मोहिलें मन्मानसा या०' (३४) शाकुन्तल.

६ 'अहो पाषाणराजींनो० (७) गुप्तमञ्जूष., 'सुखाशा काहि माते'० (१६)., 'अष्टमीचा चन्द्र'० (३६) मूकनायक. "जाहले आभार भारी'० (४८) कोल्हटकरांच्या पासूनच शिवरामपन्तांनी चाली घेतल्या.

महादेव परान्जपे[७], कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर[८], वासुदेवशास्त्री खरे[९] अित्यादि आघाडीच्या नाटककारांनीहि गज्जलाचा पुरस्कार केला आहे. परन्तु ज्या अुर्दू पदांच्या द्वारा या वृत्तांचा परिचय झाला तीं सदोष होतीं म्हणून म्हणा, वा म्हणतांना त्यांची ओढाताण होअून मूळ लघुगुरुक्रमाचा बोध नीट झाला नाही म्हणून म्हणा पण ही मराठी गज्जलांची रचना फारच शिथिल[१०] झाली आहे. गज्जलांच्या चटकदार चालींचा स्वीकार अवश्यमेव व्हावा, पण तेवढ्यासाठी वृत्तशैथिल्य हें केव्हाहि मान्य होअूं नये.

वस्तुतः काव्यक्षेत्रांत गायनाचें वर्चस्व असतांच कामा नये. गीत या लघुकाव्यप्रकारांत अर्थस्वारस्य व गायनानुकूलता हे गुण तुल्यबल असतात. पण अुत्कृष्ट गीतें वाङ्मयांत फारच दुर्मिळ असतात यावरून दोन्ही गुण समप्रमाणांत ठेवून रचना करणें किती कठिण आहे हें स्पष्टपणें दिसून येतें.




प्रत्येक कवितेगणिक अेक ठराविक लाम्बीची रेषा घेअून तिच्यांतील स्वरलालित्य व अर्थस्वारस्य यांच्या प्रमाणांत त्या रेषेचे दोन भाग केले, आणि या साऱ्या रेषा शेजारी शेजारी अर्थस्वारस्याच्या चढत्या वा अुतरत्या प्रमाणाच्या क्रमाने अुभ्या केल्या की भावगीताचें क्षेत्र गीतापासून वामनी ओवी म्हणजे जवळ जवळ गद्यच अशा छन्दापर्यन्त पसरलेलें दिसून येअील.

अुलटपक्षी गेय पद्यांत अर्थस्वारस्य कमी होत होत तराण्यांत अर्थच लुप्त होतो. काव्यरसाला क्लिष्ट स्वररचनांची सुतराम् आवश्यकता नाही. लगक्रमाप्रमाणे सरळ थोडेसें गळ्यावर म्हणत गेलें असतां जी रचना आपो-

---

७ 'शशाङ्कमुर्ते'० (५) कादम्बरी., 'कळेना की कशासाठी' (१६) कादम्बरी., ८ 'पाण्डवा सम्राट पदाला०' (३६) द्रौपदी. ९ 'वन्धांत सदा प्यारा'० अुग्रमङ्गल. १० वधूपरीक्षेंतील 'कितीहि जरी समजावि मना'० हें पद विलक्षण शैथिल्याचें अेक अुदाहरण म्हणून पहावें.

आप तालबद्ध व श्रुतिमधुर वाटते ती काव्यास अनुकूल व रसास्वादास पुरेशी असते. गज्जलालाच काय, कोणत्याहि कवितेला अमुकच चाल लाविली पाहिजे असें नाही. सध्याहि गज्जलाला अनेक चाली लावण्यांत येतात. अर्थाकडे पाहून अनुकूल अशी शुद्ध रागांतीलहि चाल कोणी लाविली तर ती हवीच आहे.

मराठी गज्जल–रचनेंतील शैथिल्य माझ्या ध्यानांत खिस्तशक १९१९ या वर्षी प्रथम आलें; व पद्यरचनेची थोडी आवड असल्यामुळे या गज्जल-वृत्तांचें सोदाहरण विवेचन करावें अशा अिच्छेने मी काही गज्जल रचिले. १९२२ च्या 'महाराष्ट्र साहित्य' मासिकांत मी हें विस्तृत विवेचन गज्जलाञ्जलि या शीर्षकाखाली सुरू केलें; पण सुमारें १६ उदाहरणें प्रसिद्ध झाल्यावर मागणीच्या अभावीं ही लेखमाला बन्द पडली. १९२३ च्या डिसेम्बरांत,याच विषयावर,सङ्क्षेपाने सर्व वृत्तें सोदाहरण देणारा अेक लेख लिहून तो वृत्तमनोरमा या नावाने काव्यचर्चा या रविकिरणमण्डळाच्या दुसऱ्या पुस्तकांत प्रसिद्ध केला. लिहिलेले मराठी गज्जल पुढे वेळोवेळीं निरनिराळ्या मासिकांतून व रविकिरणमण्डळाच्या उषा, मधुमाधव, शलाका, प्रभा या पुस्तकांतून प्रसिद्ध केले; आणि आता या अरबी-फार्सी वृत्तांतील माझी सारीच रचना प्रस्तुत गज्जलाञ्जलींत पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.

या सङ्ग्रहांतील प्रत्येक चुटका गज्जलच आहे असें नाही. मुस्तझाद् म्हणून जो दिडक्या रचनेचा प्रकार आहे त्याचींहि उदाहरणें अनुक्रमाङ्क ४४, ४५, ६० व ६६ यांत दिलीं आहेत. अेकयमकी चतुष्पदीमाला, पञ्चपदीमाला, षट्पदीमाला अित्यादि जे पद्यप्रबन्ध आहेत त्यांच्या पैकी पहिल्या प्रकाराचें उदाहरण दुसऱ्या पृष्ठावर दिलें आहे. गज्जल व कसीदा हे अेकयमकीच असावे लागतात. म्हणजे पहिल्या, दुसऱ्या व पुढील समचरणांच्या अन्तीं अेकच यमक साधिलें पाहिजे. गज्जलांत द्विपद्यांची सङ्ख्या पाचाहून अधिक व सतराहून कमी अशी मर्यादित असते; परन्तु कसीद्याच्या दीर्घतेस, भाषेंत अेका यमकाचे किती शब्द आढळतील त्यांची सङ्ख्या हीच सीमा होअू शकेल.

कसीदा व गज्जल यांच्यांत वृत्तांची विविधता आढळते. कसीदा या

स्वच्छ प्रत
ग्रं. ........ नं. ..........

पद्यप्रबन्धांत, राजाची वा उमरावाची स्तुति करून पोटगी व प्रसङ्गाविशेषीं पोरगी मिळविणें हाच कवीचा (शाअिराचा) हेतु असतो. कसीद्याचा बहुतेक भाग, शब्दालङ्कार व पाण्डित्य यांनी नटविलेल्या अत्युक्तिपूर्ण स्तुतीने भरलेला असतो. हा भाग केव्हाहि आश्रयदात्याखेरीज अितरांस नीरसच वाटणार. कसीद्याचा प्रस्ताव ( मत्ला ) मात्र, विषयदृष्ट्या गज्जलाप्रमाणे सरस असतो; आणि त्याचा सान्धा ( गुरेज़् ) पुढील स्तुतीशी कमी अधिक चमत्कृतिमय विचारसरणीने जोडून देण्यांत कवीचें कौशल्य असतें. या रूढ परन्तु नीरस काव्यप्रकाराचा सुधारलेला नमुना 'कमाल' (पृ० ५२) या चुटक्यांत पहायला मिळेल. धात्वर्थाने पाहतां गज्जल ( अरबी ग़ज़ल् ) म्हणजे प्रेमालाप होय. अर्थात् शृङ्गार हाच गज्जलाचा मुख्य् विषय होय. प्रेमगीतांत स्वाभाविकपणेंच विप्रलम्भशृङ्गाराचा आविष्कार अधिक आढळतो. काही गज्जल सृष्टिवर्णनपर, बोधपर व ध्येयस्तुतिपरहि असतात. पण गज्जल हा भावगीताप्रमाणे अेकपिण्डी असतोच असें नाही; यमकसूत्रांत गोवलेला, (-मन्ज़ूम्) गज्जल हा द्विपदीमुक्ताफळांचा जणू काय सरच होय. पण भावगीतांत, अेखाद्या द्विपदीचा मागील वा पुढील द्विपदीशी काहीहि भावसम्बन्ध नसणें हा दोष होय. हा दोष मराठी गज्ज़लांत टाळला आहे. फार्सी गज्जलांचा दुसरा दोष म्हणजे विषयवैचित्र्याचा अभाव हा होय. सारे कवि तोन् तोच अर्थ, फक्त अधिकाधिक सफाअीदार व अलङ्कारिक भाषेने व्यक्त करण्याचा उद्योग करितात. गज्जलाञ्जलींत विषयशः, प्रसङ्गशः व भावशः शक्य तितकी विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. फार्सी वाङ्मयाशी असलेल्या परिचयामुळे काही थोड्या ठिकाणीं प्रतिध्वनि अपरिहार्यपणें अुमटलेले आढळतील, अर्थव्यक्तीची पद्धति क्वचित् कोठे त्या वळणावर गेलेली दिसेल, 'विस्मृतीची समाधि' सारख्या अेक दोन गज्जलांत फार्सी वाङ्मयांतील कल्पनांचा अनुवाद सहेतुकपणें केलेला आढळेल, तथापि अेकन्दरीने पाहातां गज्जलाञ्जलींतील भावगीतें स्वतन्त्र आहेत हें दिसून येअील. व त्यांत (क्रमाङ्क ७५, ७९) आकाशभाषितासारखे अेकमुखी संव्वादहि आढळतील. अरबी–फार्सी वृत्तें शुद्ध स्वरूपांत मराठींत आणावींत या हेतूनेच हीं भावगीतें बहुतेक लिहिण्यांत आलीं आहेत.

पण शास्त्रोक्त गज्जलास अवश्य असणारें अेकयमकीपणाचें बन्धन हें, अेखाद्या क्लिष्ट लगक्रमाप्रमाणेच भावगीताच्या रचनेस जाचक होतें. या बन्धनामुळेच फार्सी गज्जलांतील द्विपद्या भावदृष्ट्या विलग व असम्बद्ध झाल्या असाव्यात. हें बन्धन चारपाच द्विपद्यांच्या पुढे पाळणें झाल्यास सहजतेचा बळी द्यावा लागतो आणि यमकेंहि तितकीं सुन्दर जुळत नाहीत. या कारणाने कित्येक भावगीतांत हें बन्धन पाळलेलें नाही. सयमक द्विपदी व चतुष्पदी यांची गुम्फण करून सुनीतेंहि रचून पाहिलीं आहेत. वस्तुतः फार्सींत चतुष्पदीला, रुबाअीला ( पृष्ठ १ वरील रुबाया पहा ) अेक तराना नामक विशिष्ट– जरा सैल करून घेतलेलें मयूर हेंच-वृत्त आहे. या वृत्तांत तिसऱ्या सहाव्या व नवव्या अक्षरांच्याच ठिकाणीं अेका गुरूबद्दल दोन लघु घालतां येतात व पांचव्या सहाव्या दोन गुरू अक्षरा-अैवजी जगणहि घालतां येतो.

या साऱ्या अरबी वृत्तांना जातिरूप द्यावें कीं नाही ? पूर्णपणें जातिरूप दिल्यास रचना सुकर होअील, पण लगक्रमाच्या वैशिष्ट्यामुळे म्हणण्याला आपोआप जें वळण येतें तें नष्ट होअील. ‘ रसने न राघवाच्या ’ हें मोरो-पन्ती पद्य वा क्रमाङ्क २८–३३ व ५१ या चुटक्यांतील रचनेप्रमाणे वृत्तास मर्यादित जातिरूपत्व दिलें तर तें इष्ट होअील.

प्रस्तुत पद्यसङ्ग्रह हा अेक हौसेचा प्रयोग आहे. कष्ट करण्यांत चुकारपणा केला नाही असें मी म्हणूं शकेन पण हा प्रयोग कितपत यशस्वी झाला आहे यावर मी मत देणें अुचित होणार नाही. असो, ‘आता लिहिलें तें लिहिलें ! हें अधिक सरस अुतरलें असतें तर बरें झालें असतें.’

शेवटीं, ज्या गज्जलप्रेमी मित्रांच्या अुत्तेजनामुळेच मी ही गज्जला-ञ्जलि सुधारून प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहे ते, ज्यांनीं माझी कल्पना समजून घेअून सहज लीलेनें मुखपृष्ठावर घालण्यासाठीं मला चित्र काढून दिलें ते चित्रकलाकुशल रा. नीळकण्ठ महादेव केळकर, बी. अे., आणि गायनाच्या बाबतींतील माझ्या शङ्कांचें निवारण करणारे प्रो. गङ्गा-धर भिकाजी अचरेकर यांचे आभार मानून ही प्रस्तावना सम्पवितों.

ता. २९–मे–१९३३ अि.
डेक्कन जिम्खाना, पुणें ४.

माधव जूलियन्

| काव्यारम्भ | लगक्रम | पृष्ठाङ्क |
|---|---|---|
| अगोट लागुनि० | [⏑—⏑— \| ⏑⏑—— \| ⏑—⏑— \| ⏑⏑—] | ७१ |
| अपार शास्त्रीं० | [⏑—⏑—— \| ⏑—⏑—— \| ⏑—⏑—— \| ⏑—⏑——] | ५ |
| अव्याज आणि० | [——⏑ \| —⏑—⏑⏑ \| ——⏑ \| —⏑——] | ९० |
| असे यौवनीं० | [⏑—— \| ⏑—— \| ⏑—— \| ⏑—] | १०० |
| असो देव किंवा० | [⏑—— \| ⏑—— \| ⏑—— \| ⏑—] | ९९ |
| आतां न कां रुचे० | [——⏑ \| —⏑—⏑ \| ⏑——⏑ \| —⏑—] | ११ |
| आनन्दकन्द० | [——⏑ \| —⏑—— \| ——⏑ \| —⏑——] | ८३ |
| आहेस तू जगीं० | [——⏑ \| —⏑—— \| ——⏑ \| —⏑——] | ८४ |
| ऊठ ऊठ, नदी० | [—⏑—⏑ \| ⏑——⏑ \| —⏑—⏑ \| ⏑——] | ८१ |
| ऊठ साकी, दे० | [—⏑—— \| —⏑—— \| —⏑—— \| —⏑——] | ३१ |
| अेकटें येऊनि० | ]—⏑—— \| —⏑—— \| —⏑—— \| —⏑—] | २६ |
| कां दया ये० | [—⏑— \| —⏑—— \| —⏑— \| —⏑——] | ९६ |
| काय करूं यापुढे० | [—⏑⏑— \| —⏑— \| —⏑⏑— \| —⏑—] | ८१ |
| किति मैल० | [⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑—] | २३ |
| किती करिशी० | [⏑—⏑⏑— \| ⏑—⏑⏑— \| ⏑—⏑⏑— \| ⏑—⏑⏑—] | १९ |
| किती सृष्टीमधे० | [⏑——— \| ⏑——— \| ⏑———] | १५ |
| कुणापाशी अता० | [⏑——— \| ⏑——— \| ⏑———] | १४ |
| कुणाला कुणी० | [⏑—— \| ⏑—— \| ⏑—— \| ⏑——] | ९७ |
| कृतीने तत्त्वकैवारी० | [⏑——— \| ⏑——— \| ⏑——— \| ⏑———] | ९ |
| केला तिने सहजेक्षणें० | [⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑—] | ३० |
| केला पद्यप्रपञ्च० | [——⏑⏑— \| —⏑⏑—— \| ⏑⏑—] | १ |
| कोठे तरि जाऊं० | [——⏑ \| ⏑——⏑ \| ⏑——⏑ \| ⏑——] | ६१ |
| गडे नको छळूं० | [⏑—⏑— \| ⏑⏑—— \| ⏑—⏑— \| ⏑⏑——] | ७० |
| गमे स्वामि संव्सार० | [⏑—— \| ⏑—— \| ⏑——] | १०१ |
| गोरी सलील० | [——⏑ \| —⏑—⏑⏑ \| ——⏑ \| —⏑——] | ८९ |
| जमल्यास आज० | [⏑⏑—⏑ \| —⏑—— \| ⏑⏑—⏑ \| —⏑——] | ८५ |
| जरि यौवनीं० | [⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑— \| ⏑⏑—⏑—] | २४ |
| जहाली अुषा जागी० | [⏑—— \| ⏑——— \| ⏑—— \| ⏑—⏑—] | ६९ |
| जाता टळूनि० | [——⏑ \| —⏑—⏑ \| ⏑——⏑ \| —⏑—] | ९३ |

जीव घेणी काय० [–⏑– – | –⏑– – | –⏑–] ४७

जीव तुझा लोभला० [–⏑– – | –⏑– – | –⏑– – | –⏑–] ३७

झुरतों तुझ्यासाठी०[⏑⏑–⏑– | ⏑⏑–⏑– | ⏑⏑ –⏑– | ⏑⏑–⏑–] २५

तिच्या समक्ष० [⏑–⏑– | ⏑⏑– – | ⏑–⏑– | ⏑⏑–] ७४

ती म्हणाली, “ साङ्ग० [–⏑– – | –⏑– – | –⏑– –|–⏑–] ३८

तुजवीण सखे० [⏑⏑– | ⏑⏑– | ⏑⏑– | ⏑⏑– ] १०४

तुझाच दास० [⏑–⏑– | ⏑⏑– – | ⏑–⏑– | ⏑⏑–] ७६

तुझ्यावीण कुठे० [⏑– –⏑ | ⏑– –⏑ | ⏑– –⏑ | ⏑– –] ५८

तुझ्या सम्भाषणाचीं० [⏑– – – | ⏑– – | ⏑– – – | ⏑– –] १७

तू आणि मी० [ ⏑⏑–⏑– | – –⏑– | ⏑⏑–⏑– | ⏑⏑–⏑– |] २६

तूजवाचूनि सुनीं ०

[ ⏑⏑– – | ⏑⏑– – | ⏑⏑– – | ⏑⏑– ‖ ⏑⏑– – | ⏑⏑–] ६६

तू भासलीस० [– –⏑ | –⏑– – | – –⏑ | –⏑–] ८७

दृष्टि तुवां फेक० [–⏑⏑– | –⏑–⏑ | –⏑⏑– | –] ८०

दैवयोगें ध्येय० [–⏑– – | –⏑– – | –⏑– – | –⏑–] ३५

न झाली भाव०[ ⏑– – –| ⏑– – –| ⏑– – –| ⏑– – – ] ७

नमोऽस्तुते जयोऽस्तुते०[ ⏑–⏑– | ⏑–⏑– | ⏑–⏑– | ⏑–⏑– | ५२

नाही तुझ्या मीं० [– –⏑– | – –⏑– | – –⏑–] १२

निज मैत्रिणीला०[⏑⏑–⏑– | ⏑⏑–⏑– | ⏑⏑–⏑– | ⏑⏑–⏑–] २८

निमालीच का० [ ⏑– –| ⏑– – –| ⏑– –| ⏑– – –] ६८

निष्ठुरतेमुळे० [–⏑⏑– | ⏑–⏑– | –⏑⏑– | ⏑–⏑–] ७८

पदें पाण्यांत० [ ⏑– – –| ⏑– – –| ⏑– – –| ⏑– –] १३

पहा कसें गौरविलें० [ ⏑–⏑– |–⏑⏑– | ⏑–⏑– |–⏑⏑–] ८१

पाहतां सुन्दरी० [–⏑– | –⏑– | –⏑– ] १०१

पुरे गडे किति० [ ⏑–⏑– | ⏑⏑– – | ⏑–⏑– | ⏑⏑–] ७५

पुरे पूर्वजांच्या० [⏑– –| ⏑– –| ⏑– –| ⏑– –] १८

पुष्प नामी तू० [–⏑– –|–⏑– –| –⏑–] ४१

प्याला भरला० [– –⏑ | ⏑–⏑– | ⏑– –] ३

प्राशितों सौन्दर्य० [–⏑––|–⏑––|–⏑––] ४६

प्रेम कोणीही० [–⏑––|–⏑––|–⏑––|–⏑––] ३२

प्रेम पाशांत० [⏑⏑⏑––|⏑⏑––|⏑⏑––|⏑⏑–] ६४

प्रेमस्वरूप आई० [––⏑|–⏑––|––⏑|–⏑––] ८२

प्रेम होईना० [–⏑––|–⏑––|–⏑––|–⏑–] ४०

प्रेम होतें तें० [–⏑––|–⏑––|–⏑––|–⏑–] ३३

प्रेमावीण जीवाला० [–––|⏑–––|⏑–––|⏑–––] १८

फिरावयास० [⏑–⏑–|⏑⏑––|⏑–⏑–|⏑⏑–] ७२

बाळ जा तप्ताश्रु० [–⏑––|–⏑––|–⏑––|–⏑–] ३९

बुझावूं मी० [⏑–––|⏑–––|⏑–––|⏑–––] १०

बुवा निस्सङ्ग० [⏑–––|⏑–––|⏑–––|⏑–––] ६

भवानी आमुची० [⏑–––|⏑–––|⏑–––|⏑–––] १२

भावपुष्पें फुललीं० [⏑⏑––|⏑⏑––|⏑⏑––|⏑⏑–] ६६

भिल्लीण न तू० [––⏑|⏑––⏑|⏑––⏑|⏑––] ५९

मनीं होती असूया० [⏑–––|⏑–––|⏑––] १६

माझ्या हृदयांत० [––⏑|⏑–⏑–|⏑––] ४

मानिनि, जाणार० [–⏑⏑–|–⏑⏑–|–⏑⏑–] ५६

मिळेना अन्तरीं० [⏑–––|⏑–––|⏑–––|⏑–––] ८

मी तुझ्यावरी० [–⏑–⏑|–⏑⏑–|–⏑–⏑|–⏑⏑–] ७७

मी श्यामले० [––⏑–|––⏑–|––⏑–|––⏑–] २०

मूर्ति तुझी० [–⏑⏑–|–⏑–⏑|–⏑⏑–|–⏑–] ८०

मोतियाचा सतेज० [⏑⏑––|⏑–⏑–|⏑⏑–] ७८

येतां दिनान्त० [––⏑|–⏑–⏑|⏑––⏑|–⏑–] ९२

येथेच गे तू० [⏑⏑–⏑–|⏑⏑–⏑–|⏑⏑–⏑–|⏑⏑–⏑–] २९

ये राज्य कोणा० [––⏑|––|––⏑|––] १०२

रम्य लाली अम्बरीं० [–⏑––|–⏑–|–⏑––|–⏑–] ५०

रसज्ञहो, पहा० [⏑–⏑–|⏑–⏑–|⏑–⏑–] ५४

रसोदात्त भाव० [⏑––⏑|–⏑–⏑|⏑––⏑|–⏑–] ८१

रक्याची सोयरीं० [ ∪ — — — | ∪ — — — | ∪ — — — | ∪ — — — ] ११

लाज जरा हास० [ — ∪ ∪ — | — ∪ ∪ — | — ∪ — ] ५७

वाट किती पाहुं० [ — ∪ ∪ — | — ∪ ∪ — | — ∪ ∪ — | — ∪ ∪ — ] ५५

वानिती काव्यांत०

[ — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — ‖ — ∪ — — | — ∪ — ] ४४

वाहवा रे वाचि० [ — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — ] ३४

विद्युलतेप्रमाणे० [ — — ∪ | — ∪ — — | — — ∪ | — ∪ — ] ८६

वेड आधी साङ्ग० [ — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — ] ४८

व्यर्थ पूर्वी म्हटलें० [ ∪ ∪ — — | ∪ ∪ — — | ∪ ∪ — — | ∪ ∪ — ] ६५

शैशवींचा सहज० [ — ∪ — — | ∪ ∪ — — | ∪ ∪ — ] ६७

शोकाच्या समुद्रीं० [ — — — | ∪ — — — | ∪ — — — ] १९

श्यामाच म्हणूं० [ — — ∪ | ∪ — — ∪ | ∪ — — ∪ | ∪ — — ] ६०

सखये, काय करूं० [ ∪ ∪ — — | ∪ ∪ — — | ∪ ∪ — — | ∪ ∪ — — ] ६४

सखे, तू पूस० [ ∪ — — — | ∪ — — — | ∪ — — — | ∪ — — — ] ९

सतेज काळे० [ ∪ — ∪ — — | ∪ — ∪ — — ] ५

सर्वदा सञ्जीवनी० [ — ∪ — | ∪∪ — ∪ — | ∪∪ — ∪ — | ∪∪ — ∪ — ] ५१

सहधर्मिणी० [ ∪ ∪ — ∪ — | ∪ ∪ — ∪ — | ∪ ∪ — ∪ — | ∪ ∪ — ∪ — ] २२

सौभाग्यसुन्दरी० [ — — ∪ | — ∪ — | — — ∪ | — ∪ — ] ८८

स्फूर्ती दिली तू०[ ∪∪ — ∪ — | ∪∪ — ∪ — | ∪∪ — ∪ — | ∪∪ — ∪ — ] २७

हाल काय० [ — ∪ — | ∪ — — — | — ∪ — | ∪ — — — ] ७७

हिन्दपुत्रांनो०

[ — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — — | — ∪ — ‖ — ∪ — — | — ∪ — ] ४१

ही तळख० [ — — ∪ | ∪ — ∪ — | ∪ — — ] २

हें काय असें० [ — — ∪ | ∪ — — — | — — ∪ | ∪ — — — ] ९५

हें काय सृष्टि० [ — — ∪ | — ∪ — ∪ | ∪ — — ∪ | — ∪ — ] ९४

होतास कसा मित्र० [ — — ∪ | ∪ — — ∪ | ∪ — — ] ६२

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत १०७७
सं. काव्य नं.
ता. ९-१२-३३
मराठी ग्रंथ संग्रहालय ८८३

# गज्जलाञ्जलि

## १ आत्मनिवेदन

केला पद्यप्रपञ्च हा कष्टाने,
घ्यावें मानुनि कष्टाने का गाणें ?
गोळा केलीं न हुर्मुजी मोत्यें कां ?
शिम्पा धरिती काय करीं शाहाणे ?
टीका असली करीत कोणी हसतो,
त्याचा न मला शब्द परन्तू डसतो,
कुम्भ अिराणी घाटाचे मी घडिले,
ठेवो यांच्यामधे स्वताचा रस तो.
सादी-हाफिझ् बुल्बुल ते शीराझी,
त्यांना न तिजा गज्जलकारांमाजी,
अन् त्यांच्याशी या गण-मात्रा जुळुनी
स्पर्धा करितां ठरेन मी वेडा जी !
हौसेने हें काम परी केलें की
हौसेमाजी कष्ट न कोणी लेखी;
केली झाली तशी कलेची सेवा,
काहीहि म्हणा परी स्मरूनी नेकी.

---

हुर्मुजी=अिराणच्या आखातांतील. अिरा=मधुर पेय.

## २ सञ्जीवनी

ही तल्लख गोड कोण बाला ?
अुल्लास अहा अुतास आला !
ये लुब्धक सोडुनी नभाला
का अिन्दु सरोवरांत न्हाला ?

आरक्त गमे जणू उषा ही,
वा आस हसे दिशांत दाही;
चापल्य असें न तीस काही,
प्याल्यांत पडे विवर्ण हाला.

नेत्रांत पहा न भीति कोठे,
कौतूहलपूर मात्र लोटे.
थारेल कसें समोर खोटें ?
हा रोख जणू सतेज भाला !

ज्योत्स्नेपरि सौम्य सज्जनाशी,
नाही परि ही परप्रकाशी;
ओढूं न बघे कुणास पाशीं,
टाकी न कुणावरी हवाला.

पाहूनि हिला मनास वाटे,
चौफेर पुन्हा वसन्त थाटे,
जाती लपुनी फुलांत काटे,
कां घालुं नये गळ्यांत माला ?

सञ्जीवन हें कुणास साधे ?
लाभे तुझियाच हें प्रसादें.
जो पात्र तुझ्या कृपेस त्या दे,
गाठील न तो कृतान्त काला.

ती आस नसे मला जराही,
मी हा विरहांत दूर राहीं;
तूझ्या स्मरणें परी धरा ही
होओी मज रम्य यज्ञशाला.

---

## ३ रसिकास

प्याला भरला तुझ्याच साठी,
भाळीं रसिका कशास आठी ?
भासे सुरओी जरी अिराणी,
आहे पण ही अिरा मराठी.
का, वेषतऱ्हा दिसे विदेशी
तेणें स्वमनीं कुतर्क घेशी ?
ठावें न कसें रसज्ञतेला ?
सौन्दर्य खुलें अनेकवेषीं.
वेषास भुलूनि जात नाही,
कोणीच असा जगांत नाही,
वाटे बघ केवि वेषभेदें
ती तीच नभीं प्रभात नाही.
प्राचीन किती परी उषा ही,
पूर्वी ऋषि हीस सूक्त गाओी,
रङ्गीं कवितेपरी नटूनी
कैशी चिरयौवनाच राही !
का वेषच अेक पाहशी तू ?
अद्वैतहि देख मानसीं तू.
तू मेघ, पिपासु बाग रे मी;
मी सागर आणखी शशी तू.

---

# ४ हृदय-राणीस

माझ्या हृदयांत तूच राणी !
नाही घडणार बेअिमानी.
　　ठेवूं किति दीस गूज चित्तीं ?
ये आज अखेर आणिबाणी.
　　वाढे, न शमे तृषा जिवाची
डोळ्यांतिल हें बघूनि पाणी.
　　वाटे तुज कां बरें कसेसें
वृत्ती मम पाहुनी दिवाणी ?
　　दे कान, दुजें न मागतों मी,
गातों तव भक्तिचींच गाणीं.
　　देशील जरी प्रसाद थोडा
गाअीनच कां कधी विराणी ?
　　आता परि अैकवीं मला मी
ती तीच पुन्हा पुन्हा कहाणी.
　　माझ्याविण का अडेल तूझें ?
तूझ्याविण मीच दीनवाणी.
　　घोटाळत तूझिया सभोती
हिण्डे जिव हा नसे ठिकाणीं.
　　स्वातन्त्र्य तुला, कुठेहि जा तू !
मी दास तुझाच गे हिमानी !
　　जाअूं तुज सोडुनी कुठे मी ?
माझ्या हृदयांत तूच राणी !

———

हिमानी = बर्फांची रास, हिमाङ्गी.

नोंद नं. ६०१८



## ५ स्व-भाव-गीत

अपार शास्त्रीं रमे म्हणो तो निरर्थ सुक्लिष्ट ते तराणे,
रुचें मला हें सदैव साधें खुल्या दिलाचें रसाळ गाणें.
मनांत गाणें स्वयेंच जागें; न सूर मागें, न ताल लागे;
प्रफुल्ल व्हावें नवानुरागें, स्फुरूनि गावें खगाप्रमाणे.
अलङ्कृतींची जरूर कां ती जिवन्त जेथे स्वरूपकान्ती ?
रसज्ञतेची कशास शिक्षा ? रुची मधूची न कोण जाणे ?
कुणास गोडी विचित्र गीतीं, न भावनेची जरी प्रतीती;
असेंच घेती बघूनि नाणें—कसें ठशाचें, कसें खणाणें.
सभोंवती या प्रचण्ड हाटीं शहाणियांची अलोट दाटी;
रमें बसूनी प्रसून-वाटीं क्षणैक व्हावें जरा दिवाणें.
प्रसन्न व्हावें सहानुभावें, स्व-भावगीतप्रबन्ध गावे,
कुणीहि यावें, जरा बसावें—इथे कुणाला सदा रहाणें ?

---

ग्रंथ संग्रहालय स्वतंत्र प्रत सं. काव्य नं. १०७७ ता. ६-१२-३३ ठाणें

६

सतेज काळे टपोर डोळे
दिसावयाला गरीब भोळे,
अता लबाडी स्मरूनि त्यांची
हुताशनीं मी अखण्ड पोळें.

---

# ७ आमची ओळख

बुवा निस्सङ्ग बैरागी स्मशानें धुण्डतों आम्ही,
स्वगानें जाग आणूनी भुतांशी खेळतों आम्ही.
जयाला ठार मारूनी जगत् गाडूनिही टाकी,
पहा सञ्जीवनी कानीं तयाच्या फुङ्कतों आम्ही.
अिथे स्वीकारितों प्रेमें जगाने टाकिलें जें तें,
भरूनी मूठ धूलीने जगीं सन्तोषतों आम्ही.
पडे घायाळ त्या लावूं सुखाने चुम्बनस्नेहें,
जगाच्या प्रीतिदुक्खांना खुशीने सोसतों आम्ही.
लिहूनी टाकिल्या गोष्टी—हृदींच्या जाहिराती या !
न वाचो वा कुणी वाचो न पर्वा ठेवितों आम्ही.
शिवूंही ना शके जेथे जगींची तीव्र ही स्पर्धा,
नभींचे भूतळीं चेण्डू स्थळीं त्या फेकितों आम्ही.
मजेने स्थापुं निर्लज्जा तिला सन्मानुनी अङ्कीं,
सुखारामीं सदा स्वामी कुठेही झोपतों आम्ही.
अनिष्ठा सौख्यहारी ही प्रियेची—ना परी भीती !
कळे आम्हां, वळे आम्हां, स्वचिन्ता फेकितों आम्ही.
गुरुत्वें आलिया येथे तुम्ही चेलेच व्हायाचे,
पहा शिष्यत्व शिष्याचें परी सम्पादितों आम्ही.
तुम्ही द्या अश्रुला अश्रू, तुम्हांला अर्पितों चावी,
पुढे मारा सुरा वक्षीं, त त्याला गाठितों आम्ही.

---

कलापिकृत 'हमारी पिछान' या गुजराथी गज्जलाचें हें भाषांतर आहे.

# ८ दिवङ्गत भगिनीस

न झाली भावगीताची अजूनी पूर्ण अस्ताअी,
मधे तों सूर का थाम्बे ? कुठे ती गायिका जाअी ?
तकाके पाचुची झाडी, दिसे ही तृत आषाढीं;
कशाला गा विसंव्वादी ? तिला ही भीति का खाअी ?
मिळेना साथही साधी, न रङ्गे राग आल्हादीं,
कलेची सेविका नादी त्यजूनी जाय ही राअी.
जिवींची साद घालावी, कुणीही साथ ना द्यावी,
न लाभे शान्ति योगाची, रसज्ञांची न टन्चाअी !
मरे तों प्रीतिची सेवा करावी आणखी—देवा !
निराशा मात्र लाधे वा ! जगाचा कायदा न्यायी !
जगाच्या विस्तृतारामीं विराजे चारुता नामी,
परी दग्धाश जीवाला गमे ही पेटली खाअी.
मिळेना नीच या ठायां जुळ्या जीवांस भेटाया,
म्हणूनी स्वर्ग धुण्डाया अुडी का मारिली ताअी ?
बरें, गा नन्दनोद्यानीं तुझ्यां ध्येयासवें गाणीं,
भवींची तेथ गान्हाणीं कशाला ? स्तब्ध मी भाअी !
जरी मी या वनीं लक्षीं न थोडे बोलके पक्षी,
तुझा तो सूर संव्रक्षीं मनीं मी—तोच तो गाअीं ?

---

# ९ हट्टी प्रेम

मिळेना अन्तरीं तूझ्या मला थोडाहि ओलावा
म्हणूनी तूज सोडावें, न तू हा बोल बोलावा.
दिव्याची दाहक ज्योती पतङ्गा चाळवी भोंती,
न त्याला स्वास्थ्य देवो ती, तरी तो गोड दुष्टावा.
पुन्हा का मोकळी रानें स्मरावीं पञ्जरस्थाला ?
धन्याला मात्र हा जाणे अभिमानी बोलका रावा.
न सोडी, सारखी ओढी स्वरूपाची तुझ्या गोडी;
न केवी धाव घे धेनू हरीचा ऐकतां पावा ?
धनुर्ध्ये–बाण घेवोनी खडे डोळे तुझे दोन्ही,
म्हणूनी काय गे कोणी न यावें प्रीतिच्या गावा ?
रिघाया बाणवर्षावीं भितो जो पौरुषाभावीं,
न त्याने मात्र या क्षेत्रीं चुकूनी पाय टाकावा.
जशी तू दाविशी भीती तशी ही वाढते प्रीती,
'नको'चा अर्थ 'हो' ऐसा मजेचा बायकी कावा !
न होवो फायदा काही, न त्याचा लोभ थोडाही;
न थाम्बे हा परी धन्दा, निखन्दा यास वन्दा वा.
हृदीं तो भाव मी ठेवीं शिळेची जो करी देवी,
त्यजूं तो साङ्ग, मी केवी ? वृथा कां माण्डिशी दावा ?

## १० प्रेमाची वकीली

सखे तू पूस, चण्डोला, त्यजूनी भूस कां जाशी ?
अुडूनी उन्च आकाशीं अुषेचें गीत कां गाशी ?
गुलाबा, दील खोलूनी कशाला स्वैर वाताला
लुटाया गन्ध तू देशी ? तुझ्या ये काय हाताला ?
समुद्रा, हा क्षयी इन्दू, रवीची अुग्र मैत्री ती,
अुड्या कां मारिशी वेड्या ? निराशा ओढवी प्रीती.
तुवांही चञ्चले देवी, घनाला श्याम पर्णावें !
न मानी जातिधर्माला कसें तें प्रेम वर्णावें ?
जबानी घेउनी यांची करी तू चौकशी माझी;
हवा तो न्याय दे आर्ये, दयाही ठेव त्यामाजी.

---

## ११ महात्मा

कृतीने तत्त्वकैवारी, महात्मा तोच या काळीं,
जनांचीं सङ्कटें वारी महात्मा तोच या काळीं.
जयाचें प्रेम हें केवी जगाला आकळी खेवीं,
झिजूनी जन्म-भू सेवी महात्मा तोच या काळीं.
जयांना धर्म-पुण्डांनी बळाने डाम्बिलें दास्यीं,
धरी जो त्यांस पोटाशी महात्मा तोच या काळीं.
पडूं द्या भार त्या स्कन्धीं, न लोपे हास्य आनन्दी,
म्हणो कोणी खुळा फन्दी, महात्मा तोच या काळीं.
कराया राष्ट्रसंशुद्धी पडे सत्याग्रहें युद्धीं,
न सत्तेला विकी बुद्धी महात्मा तोच या काळीं.
ऋताचा घेउनी ताणा अहिंस्सेचा जुना बाणा,
विणी स्वाराज्य-खादी जो महात्मा तोच या काळीं.

---

## १२ वुझावणी

बुझावूं मी किती तूते ? करावी मी किती हांजी ?
कितीदा मन्त्र अुच्चारूं ?—तुझा मी तूहि हो माझी.
अुभे मल्लोचनीं आसू, कपोलीं अन् तुझ्या हासूं—
नको गे जिन्दगी नासूं ! असे का अिश्क ही वाजी ?
अुन्हाळे, पावसाळे अन् हिवाळे लोटले भगवन् !
अजूनी मूळ भक्तीची कळी ही देख तू ताजी.
फुलांचे कुञ्ज हे नामी, रमूं गे ये सुखारामीं !
वसन्तीं जीविताच्या मी नि तूही—सोड नाराजी.
असेना हीन मी प्राणी ?! न पर्वा, तू महाराणी !
धिटाअी शुद्ध अिश्काची मला दे कौल 'हो गाजी !'
वसूनी ध्येयचक्रीं मी निघालों स्वर्ग जिङ्काया;
धुळीला वातचक्रांच्या न कोणी नीच बोला जी.
अुमेदी धावल्या माझ्या तुझ्या प्रीतीविना पङ्गू;
न होशी तूच मस्तानी, कसा गे होअुं मी वाजी ?
निमित्तें साङ्कशी कां हीं ? हृदींचा भाव हा पाही,
हृदींच्या गुप्त रत्नाची करावी काय हर्राजी ?
करीं या लोम्बते माला, नसे तोटा मुहूर्ताला,
पडूं दे आज दोघांला, तुझा मी आणि तू माझी !

---

अिश्क = प्रेम. वाजी = खेळ. हर्राजी = लिलाव.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं.
ता. ८-१२-३३

## १३ कोठे ?

रुक्याचीं सोयरीं सारीं, फुकाचा सोयरा कोठे ?
दुकाळीं सोय जो पाही जिव्हाळा तो खरा कोठे ?
सरींनी श्रावणीं वापी भरूनी वाहती वाया,
टिके जो ऐन वैशाखीं अिमानी तो झरा कोठे ?
विदेशी रङ्गिबेरङ्गी फुलांचे ताटवे जङ्गी,
अनङ्गी वाण साधा तो स्वदेशी मोगरा कोठे ?
असेना कान्ति सोन्याची ? ! टळेना धूळ होण्याची.
धुळीचें जी करी सोनें गुणी ती हुन्नरा कोठे ?
घडीची सुप्रसिद्धी ही कुणाही छापखाना दे;
तपाच्या राशिला भाळे प्रथा ती अप्सरा कोठे ?
गरीबी मोकळीकीची रुचेना चैनबाजाला;
विचारी बोलका राघू,—रुपेरी पिन्जरा कोठे ?
मिळूनी वृत्ति राजाची शमेना आग हो ज्याची,
—परन्तू हाय ! राखेचा मुखीं त्या तोबरा कोठे ?
रमावें आपुल्या कामीं, न व्हावें दास वा स्वामी,
जगाच्या विस्तृतारामीं अशांना कोपरा कोठे ?
वरूनी लाथ साहीना, तशी खालींहि झाडीना,
हिशेबी चोख जो राही,—चहा त्या नोकरा कोठे ?
भरेना पोट कष्टांनी, न विद्या-धूर्तता दोन्ही;
न ज्यांचा कायदा वाली अशांचा आसरा कोठे ?
दिखाअू शब्दशूरांचे थवे हे शुभ्रपोशाखी,
लढाअू ध्येयवादी तो जगाचा मोहरा कोठे ?

---

# १४ शिव-प्रताप

भवानी आमुची आअी, शिवाजी आमुचा राणा,
मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा.
मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्यवन्धारा,
कशाचा पारतन्त्र्याला दऱ्याखोऱ्यांत या थारा?
अडाणी मावळे काळे शिपाअी शूर पाअीचे,
उभे हे खाम्ब पोलादी मराठी हिन्दुशाहीचे.
अशांचा म्होरक्या सर्जा, म्हणूं द्या त्याजला चुव्वा,
परन्तू शत्रुचा पाया खणूनी हा करी धुव्वा.
निघाला काळ अफझल्खां धरूनी पोर आणाया,
पहातां तेज तें दैवी निमाली राक्षसी माया.
करी जो स्वत्व रक्षाया तयारी आत्मदानाची,
भवानी साह्य हो त्याला, गति स्वर्गीय मानाची.
शिवाजी दे भवानीला तमाचा पिण्ड दाणीला,
पहा हा चन्द्र बीजेचा करूनी दाखवी लीला!
गर्डीर्ची वाजतां भाण्डीं उठूनी भाण्डली झाडी,
अनाथा म्लेञ्च्छ सेनेला न सोडी, झोडुनी काढी.
हुडा हा पूर्व बाजूचा पुढारे देत ही ग्वाही—
प्रतापी हिन्दुशाहीची अिथूनी गाजली द्वाही.
स्वराज्यीं हिन्दवी आता मराठी काळ हा जाणा—
भवानी आमुची आअी, शिवाजी आमुचा राणा.

---

दाणीस = वळी. भाण्डें = तोफ. हुडा = बुरूज.

# १५ अधिष्ठात्री

पदें पाण्यांत सोडूनी बसे तन्वी तटाकीं,
पडे घाटावरी तीची जनानी पायचाकी.
बसे ही सृष्टिच्या ध्यानीं जणू कोरीव मूर्ती,
परी हे ! दृष्टिची सञ्जीवनी चौफेर टाकी.
दिसे जों भानु शैलाग्रीं बघे रङ्गूनि हीहीं,
दुणावी तो कपोलींच्या गुलाबांची तकाकी.
जलाच्या आननीं देखा जरा-रेखा दिसेना,
हृदीं शोभा सभोंतींची कशी रेखीव राखी !
खुले हृत्कान्ति कैशी ही हिच्या या साफ भालीं !
कचभ्रूची प्रतिच्छाया विरोधें सख्य झाकी.
तनूला शुभ्रकाठी ही निळी साडी सुशोभे,
गिरींच्या जाम्भळ्या रङ्गीं न ही भङ्गप्रभा की !
कुणाची कोण ही येथे अशी कां एकटी ये ?
कशाला व्यर्थ ही चिन्ता ?-न ही दैन्यास भाकी.
अुषा ही भावि आशांची अधिष्ठात्री कुमारी,
न वस्तू खेळ-विक्रीची कुणी दासी वराकी.
नव्या मन्वन्तरींची ही अुमा का शैल-बाला ?
जिची थोरीव जाणाया हवा साक्षात् पिनाकी !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणे

भङ्ग-प्रभा = चुण्यांची शोभा. अधिष्ठात्री = मर्मी...

# १६ परिदेवना

कुणापाशी अता मी प्रेम मागावें ?
कुणाला चोरटें हें दुक्ख साङ्गावें ?
गमे मी अेकला या लोकसम्मर्दीं,
जिवाचा कोण्डमारा ही करी गर्दी.
स्वताचीं मी स्वताशी गुञ्जतों गाणीं,
मुकी लोकांमधे माझी पडो वाणी.
नको ते शब्द ! झाले द्वाड ते भारी,
अनर्थाच्या रहाती हाय शेजारीं !
कळे श्वासांतुनीही स्पष्ट जें तूतें
कशाला द्वाड शब्दांनी निवेदूं तें ?
थिजावें का वसन्तीं जीविताच्या मी ?
जळावें का मृगाक्षी, नन्दनारामीं ?
खरें तें प्रेम केलें ना तुवां मागे ?
दिलेलें घेतलें मागूनि तू कां गे ?
खुलेना दोनदा हृत्पुष्प हें जन्मीं,
तुझी लीला !—बुडालों सर्वथा अन् मी.

# १७ विलापिक

किती सृष्टीमधे सौन्दर्य देखावे,
परी तेथे न माझें गीत झेपावे.
करी आक्रोश हें रानीं तमीं जेथ
पडे घायाळ आशा प्रीतिच्या घावें.
कुणी ओढूनि याला आणिलें येथे
सफाईने अरण्यीं देअुनी कावे ?
हवें जीवास तें लाभे रडूनी का ?
सदाचा जीव हा वाऱ्यावरी धावे.
मुखीं घोळे जनांच्या शब्द गीताचा—
परन्तू गूज शब्दाचें तुला ठावें.
न अैकूं ये तुला, तू उन्च शैलाग्रीं—
तिथे दूरान्तरें गोडीच तो पावे.

---

# १८ हेमन्त

मनीं होती असूया ती पळाली,
बढाअी पात्रतेची फोल झाली.
रगीच्या त्या अुमेदी आज कोठे ?
अता ती हाव सत्तेची गळाली.
भरे हेमन्त अन्तर्बाह्य विश्वीं,
कशाचे हेलकावे अुन्चखाली ?
कशाची अन् कुणाची अूब आता ?
हिवाळ्याचा जिव्हाळा ये कपाळीं.
प्रिये—छे ! शब्द हा काढूं कसा मी ?
जयाचा हक्क हा, तो भाग्यशाली !
कुठे मी काजवा या भूतलींचा,
कुठे तारा स्थिरे जी अन्तरालीं ?
कुठे कोपींत मी माझ्या तृणाच्या,
कुठे तू त्या तुझ्या अैने-महालीं ?
कुठे अेकादशी माझी सदाची,
कुठे रात्रीं तुझी गाजे दिवाळी ?
कुठे जागाच मी राहूनि माझा
भरीं रात्रीं पहारा चोरचाली,
कुठे झोपेंत अिश्काच्या नशेने
प्रभातींही परांच्या तू न्यहालीं ?
हिमें कैलास होवो शीर्ष माझें,
तुझ्या काश्मीर हो अुत्फुल्ल गालीं !
दिसांमागूनि गेले दीस जाती,
वसन्ताशा अता ती अन्तकालीं !

## १९ समाधान

तुझ्या सम्भाषणाची मला लाभे सुधा ही,
वियोगाचा न आता मला चडांव्शु दाही.
तुझ्या मन्द स्मितांनी अुडूं हा जीव लागे,
कधी त्वद्वर्तनींची चळेना ठेंपराअी.
तुझी छायाछवीही करीना धन्य अन्या
तिथे या दर्शनाची कमी का गे कमाअी?
जरी संव्सार-यात्रा ही सदाची चुकेना,
तुझ्या या देवडीची तरी लाभो सराअी.
तुझ्या ठायींच जेथे असें पावित्र्य आहे,
कशाला पण्ढरी मी स्मरूं? कां धौम-वाअी?
तुझ्या अिच्छेप्रमाणे घडूं दे योग भावी,
असे जीवांत आशा, कशाला वेड-घाअी?
तुला का आश्रिताची मुळी चिन्ताच नाही?
करूं कां अेकला मी नशीबाशी लढाअी?
तुझ्या सेवेंत लाभे जिथे निश्चिन्त शान्ती,
कशाला काळजीची हवी ती पादशाही?

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं.........
ता...........
ठाणे.

# २० प्रेम-माहात्म्य

प्रेमावीण जीवाला कशाचा जीवनीं आधार् ?
चारी मुक्ति देई हें, जिणें यावीण कारागार् !
कोणाला न हो बाधा कधीही मूर्तिपूजेची ?
पूजीं मूर्तिला त्या मी जिथे तो भास हो साकार् ?
ने हें चञ्चल स्वर्गीं, जिवाचें मोलही मागे,
सौदा हा नसे किंवा दिखाऊ अेक शिष्टाचार्.
देण्यावाचुनी येथे न ये व्यापार तेजीला,
हा तोट्यांत नित्याचा, पहा अव्याज हा व्यापार् !
चिन्ता कां अुद्याची ती ? अुद्या होणार होवो तें !
व्हा आताच दामाजी, लुटीला जाअुं द्या भाण्डार्.
जा गोमन्तकीं प्रेमें, विरक्तीचा सहारा कां ?
दावी चारु मायेचें रहस्य प्रेम-जादूगार्.
वाटो भास हा मिथ्या क्षणाचा दिव्य सौख्याचा,
ने हें स्वप्न जीवाला कटू त्या जागृतीच्या पार्.

---

## २१ प्रेमाचें वेड

शोकाच्या समुद्रीं खाउनी गोते
प्रेमज्ञान माझें राहिलें कोठें.
आपोआप केवी दीप हा पेटे
गेलेला निराशावायुच्या झोतें ?
वैशाखांत वाळूची दिसो रेषा,
आषाढीं तिथे कल्लोलिनी लोटे.
मी धारेंत जाऊं का वहावूनी ?
तटीं दुस्सह्य उत्कण्ठा पहा होते.
प्रेमावीण जाअी हें जिणें वाया,
जीवा अेकदा स्पर्शूनि जावो तें !
निन्दायुक्त हास्यें कां पहाती हे ?
मोठे वीतरागी ठोकळे गोटे !
स्वर्गीं मृत्युमागूनी हवी रम्भा,
दम्भाने अिथे कां बोलती खोटें ?

---

## २२ फलश्रुति

किती करिशी विलाप कवे, असा कवितेच्चिया भजनीं:
पदें यमकें रचूनि तुला हवा तरि काय लाभ जनीं ?
असे जरि कीर्ति मोहमयी न दे यश ती कधी प्रणयीं;
ठसो कविता प्रिया-हृदयीं; तिला प्रिय भिन्न अर्थ मनीं.
पुन्हा बघ कीर्ति काय बरें ? अशाश्वत अेक फुङ्कर रे !
तुझा भडका ! प्रकाश कुणा ? पहा, गति दिव्य ही कवनीं !

---

# २३ श्यामलेस

मी श्यामले, बन्दी तुझा वन्दीं तुला अभ्यन्तरीं,
तू दक्षिणा दे वा न दे, निश्शब्द मी सेवा करीं.
हें रक्त तारुण्यांतलें देहांत नाचूं लागलें,
खेळो खुळें प्रेमागळें, थाम्बेल हें कालान्तरीं.
ओष्ठ स्फुरे, आत्मा अुडे, बाहू कसे होती पुढे,
अुर्वीतलीं हे बापुडे, तू शुक्र की श्यामाम्बरीं.
हें चित्त भोळें भाबडें घेअी अुशीं तुझ्याकडे,
याचें तुला कां साकडें ? दुष्प्राप्य तू अुन्चावरी.
देअूं नको तू चुम्बनें, देअूं नको आलिङ्गनें,
देअूं नको तू दर्शनें, मी धर्म माझा आचरीं.
त्वन्मन्दिराचें अग्र मी वन्दूनि मन्मार्गं क्रमीं,
मी भक्तिच्या या सम्भ्रमीं जाणेंच माझी पायरी.
हे हृत्प्रभे, हे दुर्लभे, हे स्वाभिमानी भामिनी,
हे कामिनी, हे स्वामिनी, येअूं नको तू पञ्जरीं.
ताजी कळी तू कोवळी राही कुठेही मोकळी,
बाधा वियोगाची मुळीं नाहीच वायूला परी.
भद्रासनीं चित्ताचिया ही शोभते भक्तिप्रिया;
सारें दिला अर्पूनिया मी पूजितों माझ्या घरीं.

---

## २४ आओी

नाही तुझ्या मी पोटचा गोळा परी
'आओी!' म्हणूनी हाक मारी वैखरी.
नाही तुझ्या दुग्धावरीही पोसलों,
कोठूनि लागे ओढ अैशी अन्तरीं?
स्वप्नींहि नाही पाहिलें बाल्यीं तुला,
कां भाव बाल्यांतील हा येअी वरी?
गेली तिशी लोटूनि अन् मी बाल का?
कां अैन वैशाखीं नवी वाहे झरी?
माझे न केले लाड तू केव्हा, तशी
केली तुझीही मी न केव्हा चाकरी.
आश्चर्य की तू दृक्पथीं येतां क्षणी
निश्शब्द पूजा मी तुझी चित्तीं करीं.
सन्तुष्ट मी दृष्टिप्रसादें तूझिया
तत्काल औदासीन्य माझें तो हरी.
माझें तुझें नातें कधीचें कोठलें?
ही काय माया, योजना वा ओश्वरी?
माझी मला काही कळेना पात्रता,
तैशीच तूझ्या थोरवीची पायरी.

# २५ सहधर्मिणीस

सहधर्मिणी, तुजवाचुनी दुनिया सुनी मज वाटते,
फिरतों प्रसन्न अुन्हांत मी तरि अन्तरीं तम दाटतें !

हसतों जनांत वरीवरी करुनी रसाळ विनोद मी
परि अेकला पडतां घरीं हुरहूर गूढ न हो कमी.

जनता जिथे सुखमद्य पी रसरङ्गमङ्गल अुत्सवीं
बघुनी तिथे सुखि जोडपीं हरपे मदीय मुखच्छवी.

भरयौवनींहि म्हणूनि मी फिरतों वनीं हृदयप्रभे,
परि हाय ! राहुनि राहुनी सय हो जुनी मज दुर्लभे !

डुबेरें सड्यावर रान का घनदाट लोकर मर्गजी ?
दिसते हरिद्वसना कशी वनदेवता सुखगर्क जी !

कुसरीस शुभ्र बहार का वनतारका करिती स्मितें ?
बहरूनि रानगुलाब हे मधुराग विस्तरिती अिथे.

चढती दरीतुनि मेघ अन् धरिती द्युमण्डलवाट ते—
फिरतों प्रसन्न अुन्हांत मी तरि अन्तरीं तम दाटतें !

---

सडा=डोङ्गरसपाटी. मर्गजी=पाचूची.

# २६ मानस-सुन्दरी

किति मैल अन्तर राहिलें अपुल्यांत मोहन-मञ्जरी !
किति मास अन्तर जाहलें अपुल्यांत मानस-सुन्दरी !
तव गौर ताम्बुस चेहरा लव हासरा, लव लाजरा;
नवतींत बालिशता जरा, विरहींहि दे सुख अन्तरीं.
किति शान्तता तुझिया मुखीं, मधु मुग्ध भाव सदासुखी
किति जीवनक्रम चारु की स्मृति धीर दे भवसङ्गरीं !
नजरेंत जादुगिरी पुरी, अनुरागवर्धक माधुरी,
नच मत्त मादक आसुरी, नच तीक्ष्ण भेदक खञ्जरी !
तव गीत मञ्जुळ दूर तें, घुमती मनीं परि सूर ते,
वघ वारिती हुरहूर ते ढग जेवि मारुत अम्बरीं.
फुलपाखरापरि धाव घे सुमनांवरी तव भाव गे;
कधि पाप हें न घडो प्रभो ! कुणि घालणें तुज पञ्जरीं.
निजतन्त्रतेंत तरङ्गशी, अपुल्या सुखांतच रङ्गशी,
तुझिया हृदीं परि प्रेम तें जणु हेम शम्भर नम्बरी !
जर उन्नती तव चिन्तनें जर सद्गती तव दर्शनें,
भवभीति कां तर मानणें, दडणें कुठे गिरिकन्दरीं ?

# २७ सानुली

जरि यौवनीं शिरलीस चञ्चल पाउलीं
गमशी मला परि तू अजूनिहि सानुली.
बघतां सतेज सुवर्ण अिन्दुमुखीं तुझ्या
रमणीय हेमलताच तू पडते भुलीं.
कुरळी तुझी वट ये पुढे निटिलावरी
तिज सारितां किति कौतुकें बघशी मुली !
अपुल्या वयांमधि हें न अन्तर थोडकें,
न वघे परी वय मैत्रिकी शुभ आपुली.
तव नाव सूचवि शान्ति, वण्ड तुझें सदा,
करिशी समान विनोद दावुनि वाकुली.
दिसतां विषाद परी मुखीं कधि माझिया
करिशी सचिन्तच चौकशी जणु माउली !
तव सङ्गतींत तरङ्गती सुख-वीचि गे,
तव भावना बहरूनि होय सदाफुली.
किति दूर मी ? परि दे तुझी स्मृति शान्तता;
मजला पुरे स्मृतिचीहि सौख्यद साउली.

## २८ मूक मागणी

झुरतों तुझ्यासाठी परी कळणार हें तुजला कसें ?
डोळ्यांत हृद्गत माझिया तुज कां दिसें न मदालसे ?
चाले हळू डौलांत ती मूर्ती तुझी दिसतां पथीं
चारीहि डोळे भेटती मग कां असें ? मग कां असें ?
खोटेंच का म्हणती कवी ?—प्रणया न अन्तर थाम्बवी,
दुरुनीहि भाषा पल्लवी शकतीं कराया मानसें.
म्हणती अशिक्षित चातुरी युवतीमधेच पहा पुरी;
मग मागणीविण मन्जुरी देशी न कां तू राजसे ?
साङ्गूंच का भेटूनिया की तू जिवाची या प्रिया ?
भुलतात ना पुरुषा स्त्रिया झुलवील तो जर साहसें ?
म्हणती, स्त्रिया अबला तुम्ही, पुरुषी कृती ती मर्दुमी;
न कथूं शकें तुज हेतु मी, मनिं खोल तो दडुनी ठसे.
पुरुषी कसा अभिमान हा लववी न मान जरा पहा !
अव्हेरितां भलती तऱ्हा !—जगतांत होइल ना हसें ?
जातीं दिनांवरतीं दिनें वेऱ्यापरी तुझियाविणें;
जरि घेरिलें मज भीतिने हृदयीं तरी आशा वसे.
तुज सेवितां नच ये अता भक्तास तू जरि देवता;
भटकूं किती दिन एकटा ? व्यसनांतुनी सुटका नसे.
तपतां धरा घन वर्षतो, ये शान्ततेसह हर्ष तों,
कर तूहि सौख्य-स्पर्श तो तव रागरञ्जित वाग्रसें.

---

पल्लवी < पल्लव=प्रेम.

# २९ तू आणि मी

तू आणि मी मिळुनी अिथे दृश्यें मनोहर देखिलीं,
तू आणि मी मिळुनी अिथे स्वप्नें हवेवर रेखिलीं,
तू आणि मी मिळुनी अिथे म्हटलें क्रमूं घडि नेमिली,
मी अेकटा भटकें अिथे, कळली अता तव बेदिली.

सुकले अुभे रजतौघ ते, सुकली सुखी कुसुमावली,
विटल्या पहा पहिल्या मअू हिरव्या तकाकित मखमली,
आर्द्र प्रकाश न शीकरांतुनि अुल्हसे वसुधातलीं,
चोहीकडे ही रुक्षता पिवळी छटा फैलावली.

निस्सङ्ग नील नभीं परी गाम्भीर्य निश्चल भासतें,
उत्तुङ्ग नील गिरीवरी गाम्भीर्य निर्मल हासतें,
खाली दरींतिल काननीं गाम्भीर्य भीषण साचतें,
माझ्या मनींच्या प्राङ्गणीं हुरहूर सुन्दर नाचते.

येथे स्थिरेना चारुता बान्धूं कशाला गेह मी ?
हुडकीत चारु गभीरता हिण्डेन भूवर नेहमी.

# ३० निर्माल्य-समर्पण

स्फूर्ती दिली तू, गाअिलीं मी फार पूर्वी गायनें,
पायीं तुझ्या मी वाहिलीं तीं प्रेमगीतोपायनें,
  पिवळी जुनी कविता-वही ही पाहुनी वाटे अता
सायन्तनीं स्मरतां उषा वाटें जसें हसिताननें !

दृष्टींतुनी चुकती न हे जरि साम्प्रदायिक मायने
गवसे अकल्पित अर्थही नवसूक्ष्मभावरसायनें,
  माझीच मात्र न हो मला जाणीव राजस मानिनी,
कवनांत माझ्या अैकतों तव मागलीं मधुभाषणें.

माझ्या–तुझ्यामधि साचलें कित्येक वर्षांचें धुकें,
विसरूनि गेलों गान तें कीं जाहलों दोघे मुके,
  ती तीव्रता, आसक्ति ती गेली, अहन्ता लोपली,
भक्तीच केवळ राहिली, न हिचा जिवन्त झरा सुके.

  बदलूनि मन्त्र जुना पुन्हा निर्माल्य हा तुज वाहिला.
  दिन सम्पला, कृष्णाम्बरीं ध्रुव मात्र तेवत राहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं..........
ता..............
ठाणें.

# ३१ तेथेच

निज मैत्रिणीला घेउनी तरुणी फिराया ये कुणी,
सोल्लास हासत टेकडी चढती श्रमास न लेखुनी,
टोकावरी बसती कशा या अेकमेका टेकुनी—
मज भूत भेसुर आठवे हें दृश्य सुन्दर देखुनी.

तेथेच आम्ही बैसलों निज हृद्गतें बोलावया
तेथेच काढुनि दाविल्या सोत्कण्ठ मी कविता-वह्या,
तेथेच गाअुनि दाविलीं कौमारगीतें मी तया
तेथेच ती दिसली अुषा सन्ध्याक्षणीं असल्याच या.

दोघेहि आशाचारुतेमाधि पार गेलों रङ्गुनी,
गमलें वरीन ध्येय मी प्रत्यक्ष तें उल्लङ्घुनी;
वश चारुतेला तो करी न परी हवेंत तरङ्गुनी—
जगतों कसा तरि मी खुळा आशेवरी मन भङ्गुनी.

वदनीं, हृदींची यांचिया आशा हसे अुच्छृङ्खल,
'होवो' मनांतच मी म्हणें, 'यांचें तरी शुभमङ्गल!'

---

# ३२ येथेच

येथेच गे तू चाखिली कवितेंतली मम माधुरी,
सुरसज्ञतेसह दाविली निज मञ्जुभाषणचातुरी.
तो हाच कातळ काजळी, सन्ध्या तशी आरक्त ही,
हिरवी तशी झाडी तळीं, गिरिपङ्क्ति दूर तशी भुरी.
परि दोन या सन्ध्यांमधे जो काळ गेला लोटुनी
कान्ती तयें किति पाहिली जरि गुप्त ती अपुल्या उरीं.
विजनीं अिथे मी प्रत्यहीं बसतोंच सङ्केतस्थलीं,
ठरवूनि तू स्मरशी न तू? तव भावना चपला पुरी!
श्रद्धाळु साधा मी फसें, जगतीं स्वभावच हा गुन्हा!
निर्दोष बाजुस तू पुन्हा करणी करूनि मयासुरी!
हुरळूनि जावें कां घनें चपला जरी बहु साजरी?
अश्रूंत हो लय, ही गती येतां सखी अन्तःपुरीं.
रङ्गूनि मी गेलों जणू कुणि अप्सरा मज लाभली
—न मिळेच ती मेल्याविना करुनी रणांत बहादुरी.
स्वप्नींहि ये न कधी अशी द्विमुखी परी ही कीर्ति ये,
अङ्गार दे उधळूनि ही माझ्या मधुप्रेमाङ्कुरीं.
याचेंहि काय तुला सखे? उलटी मजाच दिसेल की!
'वणवा न तो दीपावली!' म्हणतात जे वसती दुरी.
कुणि हाच गज्जल दावितां म्हणशील वेळुनि मान तू—
म्हणती वृथा न कवी तया, किति भावनोत्कट माधुरी!

---

## ३२ प्रेमाचा अुदय

केला तिने सहजेक्षणें हृत्प्रान्त माझा खालसा
अनुकूल राज्य करील ती, आशा नवी ये मानसा.
स्वातन्त्र्य गेलें, जाअुं द्या! बेबन्दशाअी कासया?
त्या मत्त चारु दृष्टिचा हृदयावरी पडला ठसा.
अपुल्याच नादीं रङ्गते, बघते क्वचित् माझ्याकडे,
डोळे भरूनि दुरूनि मी बघतों प्रियेस मदालसा.
न कुठे जरी ती लक्ष्य दे, न द्रोह हो राज्यामधे,
हृद्वैभवें नटली दिसे चोहीकडे मजला रसा.
करितां तिची मी पायरी वाटे मला मी राय की!
कोणापुढेहि तिच्याविना न धरीन मी अपुला पसा.
धरुनी तिचा ध्वज अुन्च दिग्विजयास हा मी चाललों,
महिमा महीवरती तिचा पसरीन ही दृढ लालसा.
सारें पुढे शुभमङ्गलप्रद तें भविष्य दिसे मला;
घालील कण्ठीं माझिया मग वैजयन्ती राजसा.
व्यवहारकोविद लोक हो, श्रद्धा तुम्हांस न ही पटे;
अपुले हिशेब करा सुखें, गणुनी खुळा मज जा हसा!

---

रसा = पृथ्वी.

## ३४ विस्मृतीची समाधि

अूठ साकी ! दे भरोनी वारुणीचा अेक पेला;
रात्र ती गेली सरोनी मित्र ये व्योमीं उदेला.
लाज, भीती मोकळोनी बैसलों ओसाड कोनीं,
ओरडो काहीहि कोणी, लौकिकाला जीव मेला.
'आज' ही घे रोख हातीं, पाहिली कोणी 'उद्या' ती?
होअुनी जाअील माती, ये न सन्धी दोन वेळा.
कां गडया पर्वा पतीची, काळचक्राच्या गतीची?
मौज माध्वीसङ्गतीची लूट, हो खय्याम-चेला!
तोच घे अध्यात्मकोडीं चोइस्यांची ज्यास गोडी;
मद्यगीतप्रीत सोडी तो गणावा रूक्ष हेला!
वाढु दे पाश्चात्य सत्ता, खाअु दे पौरस्त्य लत्ता!
दृष्टि तैशी सृष्टि! देई दृष्टिला गुत्ता तजेला.
नाचरे अद्यापि वारे, शैलही गम्भीर सारे,
अम्बरीं तेजाळ तारे, सन्थ पाणी आपगेला.
होअुनी वासन्त वर्षा पूर ये रानांत हर्षा;
देख या पुष्पप्रकर्षा! खेद तो कोठेच गेला!
बुल्बुला, टाकूनि आधी तर्कवादाची अुपाधी
प्रेमगीतें गोड साधीं गा, तयांचा मी भुकेला.
गा दिवाणांतील गाणीं, वाहु दे वाणी दिवाणी;
झोकतों मी मद्यपेला, हुङ्ग तूही पुष्पझेला!
अूठ साकी वेळ साधी, आणखी दे अेक पेला
—विस्मृतीची ही समाधी दाद ना दे काळ-खेळा.

---

साकी=मद्य ओतून देणारी सुन्दरी. दिवाण=गज्जल-सङ्ग्रह.

# ३५ प्रेम की हेम

प्रेम कोणीही करीना कां अशी फिर्याद खोटी ?
प्रेम दे अन्यास आधी, ठेविशी कां स्वार्थ पोटीं ?
पाहशी की लोक देती सुन्दरींना प्रेम-भेटी;
प्रेम तें सङ्गीन गुच्छीं, प्रेम तें रङ्गीन ओठीं.
हेम तू साक्षात् सुवर्णे ! बद्ध व्हावें का सुवर्णें ?
धर्मसंव्स्कारें प्रतिष्ठा येअिना सौंद्यास मोठी.
हृद्गुणाला जें अव्हेरी प्रेम तें गे कोठवेरी ?
अन्तराची हो जव्हेरी, फेकुनी दे गारगोटी !
आपल्या या चारुतेशी विस्मरूनी जा सुकेशी,
भाळतां कोणास देशी कां न भक्तीची सचोटी ?
प्रीतिची ना भूक लागे ? काय साङ्गूं मी तुला गे ?
प्रेम लाभे प्रेमळाला, त्याग ही त्याची कसोटी.
येअुं दे दारीं भिकारीं, भूक घे त्याची विचारीं,
चौत ही चाले भिचारी, त्यास दे, दूरी न लोटीं.

# २६ प्रत्युत्तर

"प्रेम होतें, तें निमालें काय त्याला मी करूं ?
कोम आला, वाढला अन् वाळला आता तरू.
जन्मलें जें मृत्यु त्याला ठेविलेला मागुनी—
काळरूपी कायदा हा, त्यापुढे मी लेकरूं.
मर्द होऊनी मृताचा शोक वाया कां असा ?
कां नये 'होणार' पाहूं आणि 'झालें' विस्मरूं ?"
जीवितीं आराम नाही, भोवती तापे मरू,
वाळवण्टीं त्यांत तू का अन्थरावे गोखरू ?
कां वकीली ? सख्य गेलें, जाहलें तें जाहलें !
पाहशी वैऱ्यापरी कां काळजाला पोखरूं ?
प्रेम वाटे तूज जाणों रङ्गधारी तेरडा,
आणि राहे नित्य का हा चारु रूपाचा सरू ?
या जगींच्या कायद्याची प्रेम पर्वा ठेविना,
वाट बान्धांतूनि काढी आणि लागे पाझरूं.
प्रेम गेलें, दुक्ख मेलें ! जा, तुझी तू स्वामिनी !
चञ्चले, आराधना मी विस्मृतीची कां करूं ?
प्रेम होतें, बोलशी तू, हें खरें सारें तरी
पूर्वकालींच्या स्मृतीला कां नये तू आदरूं ?
हौसजिज्ञासा क्षणाची का जिवाला लागली
जीमुळे रङ्गेल पुष्पीं झेप घे फुलपाखरूं ?
प्रीतिसङ्गें जे सुखाचे दीस गेले ते खरे !
आज भाण्डारें रितीं हीं, ये स्मृतींनी त्या भरूं !
मृत्यु ज्याला जन्म त्याला ठेविलेला मागुनी
ही निराशेतील आशा कां नये स्वान्तीं धरूं ?

---

## ३७ क्षात्रधर्म

वाहवा रे वाचिवीर प्रेमपाठी फाकडे !
वाहवा रे शूर राघू वेषवेडे भाबडे !

बन्धुनाशीं दावितां शास्त्रोक्त औदासीन्य वा !
आणि पाळी आपुली येतांच लोटे कां रडे ?

या कुणी वन्द्य स्मृती केल्या कुणासाठी पहा,
काळलेखांचा करा अभ्यास, वाचा, घ्या धडे.

दुर्बळांची नागमोडी चाल ती शोभो तयां,
वीर पाताळांतुनीही खेचुनी दे हासडे.

संस्कृतीच्या रक्षणाला शक्ति कोठे दाण्डगी ?
जिङ्कितें आर्यांस पूर्वी कां जहाले राङ्डे ?

रोमचें साम्राज्य तें कां रानट्यांनी झोडिलें ?
संस्कृतीचें ओज जातां केवढा घाला पडे !

आपुल्या संरक्षणाची काळजी अन्यावरी ?!
देवही पाही, न वारी भेकडांचें साकडें.

स्वर्गवासी देव तो पाही परीक्षा तूमची,
का प्रतीक्षेने वहाती शत्रुपापाचे घडे ?

बोलतां, आम्ही सुपर्ण व्योमसञ्चारी, परी
जुम्पिले घाण्यास जातां आणि नेत्रीं झापडें !

जन्मलां शार्दूलवंशीं, स्वत्व जाणा, आचरा;
धूर्तता ये घेउनी का जम्बुकाचें कातडें ?

शान्ततावादी बना सामर्थ्य अङ्गीं आणुनी,
व्यर्थ आत्मानात्मचिन्ता कां ? बघा देहाकडे.

काय हो शेळया हजारों अेकट्या वाघापुढे ?
द्रेववत् निश्चेष्ट देखा कागदींचे आकडे ?

देश धर्म-स्त्री-त्रयीची या प्रतिष्ठा साण्डुनी
वाचवूं स्वप्राण पाही आर्य तो हें ना घडे.
मार खाअूनी जगावें—अप्रतिष्ठा ती नको !
क्षात्रियाला क्षेत्र-तीर्थी मृत्यु कार्यी आवडे.

---

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

## ३८ पुनर्मीलनकाळीं

दैवयोगें ध्येय आता भेटण्याचें घाटतें
तों धुकें कां अैन वेळीं त्वन्मनीं कोन्दाटतें ?
चेहरा गम्भीर कां गे ? मावळे अुल्लास कां ?
ओळखीचे भाव कोठे लोपले सैराट ते ?
जीविताचा चैत्र जातां सन्धि आता ये तरी
प्रीतिचें पाणी जितें का ग्रीष्मकाळीं आटतें ?
लागलें का खूळ तूतें ? काय वेडी कल्पना !
अन्तरींची शुद्धि का बाह्योपचारें बाटते ?
प्रेम सौजन्यें करी जो तो सखा माझाहि गे,
मत्सराभावें खुलूनी प्रेमशोभा थाटते.
मित्र जाअूनीच यावी सन्धि सोन्याची परी,
या विचारें दील माझेंही पहा गे फाटतें.
काळ दे हालाहलाच्या मागुनी पीयूष हें,
अेरव्ही पेल्यांत दे तो वीख काठोकाठ तें.
दुष्ट काळें दीस थोडे ठेविले आता, परी
प्रेमयोगाची मजा अेका क्षणींही साठते.

---

# ३९ आशावादी

एकटें येऊनि येथे एकटें जाणें पडे,
मार्ग अन्धाराहुनी हा जाय अन्धाराकडे.
देश भासे भोवती मर्यादित दृष्टीस हा,
त्यामधे मैदान कोठे अन् दरी कोठे कडे.
चालण्याचा येइ कण्टाळा जरी केव्हा तरी
थाम्बवेना, पाय हे नादामधे नेती पुढे.
मार्ग नाना चालती वेगें कुणी, कोणी हळू;
भेट जीवाची जुळया दुर्मीळ दैवाने घडे.
सङ्गती नाही सदाची स्पष्ट हो जाणीव ही—
चित्त शोकाविष्ट थाम्बे, का परी यात्रा अडे ?
मागल्या दृश्यांसवें अस्पष्ट हो त्याची स्मृती,
काळ ही जादू करी की नेत्र होती कोरडे.
सर्वनाशी पूर जातां ओसरूनी मागुनी
सृष्टि तेथे हो नवी अन नष्ट तें खाली दडे.
लोपती चित्रें जुनीं तों दृक्पथीं येती नवीं,
पालवे आशा हृदीं अन् दृष्टि या दृश्यीं जडे.
—पद्मपत्रीं बिन्दु तेवी तू नि मी देवी जगीं,
नित्यता नाही म्हणूनी का नये भेटूं गडे ?

---

# ४० प्रेमाची दक्षिणा

जीव तूझा लोभला माझ्यावरी रे शोभना,
या ऋणाची विस्मृती ती ना कधी होवो मना !
कां मुळी कोणी करावें प्रेम अेखाद्यावरी ?
हें तुझें सौजन्य पाणी आणितें या लोचनां.
ज्योति लागूनीहि तूझी पेट मी घेईंच ना,
नित्य खोचूनी तरी मारूं नको तू टोमणा.
वर्फ हें जेणें द्रवे तेणेंच पाणी आटतें,
लागणीला जन्म दे का मागणीची घोषणा ?
शक्तिच्या राज्यांत सक्ती शोभते शोभो तिथे !
प्रीतिला स्वातन्त्र्य आधी पाहिजे, का होय ना ?
जन्मता सान्निध्य लाभे, नित्य तें कैचें परी ?
नर्मदा-शोणांस नेई दूर दैवी योजना.
आपुल्यामध्ये पडूं दे शैलराजी सह्य ही—
भेटती दूरान्तरें सप्रेम कृष्णा-कोयना.
चाललों अेका दिशेने थोडकें का हें असें ?
सागरीं अेकाच भेटूं अन्तकालीं मोहना.

---

# ४१ प्रश्नोत्तर

तो म्हणाली, "साङ्ग रे होती कशी ती देखणी."
मी म्हणालों, "देखणी मीही न गे तीते गणीं."
ती म्हणाली, "सावळा का वर्ण तो होता तिचा?"
मी म्हणालों, "गौर होती, प्रश्न नाही कान्तिचा."
ती म्हणाली, "का स्वभावें गोड होती फार ती?"
मी म्हणालों, "तो कळेना गे जडे जेव्हा रती."
तो म्हणाली, "आणि अर्थात् याचना झाली तिची?"
मी म्हणालों, "पूर्तता तेणेंच होओ प्रीतिची."
ती म्हणाली, "अन् कृपा केली अव्हेराची तिनें?"
मी म्हणालों, "त्या कृपेने शान्त आता हीं दिनें!"
ती म्हणाली, "ये वियोगें केवि चित्तीं शान्तता?"
मी म्हणालों, "मोहिनी ती वीज होती तत्त्वता."
ती म्हणाली, "मोह का अद्यापिही रेङ्गाळतो?"
मी म्हणालों, "विस्मरेना पार गेला काळ तो."
ती म्हणाली, "भावनेची, छे! गमे छायाच ती!"
मी म्हणालों, "अन्धळी भावोर्मि होती साच ती!"
ती म्हणाली, "ही अहन्ता अेक जातीची दिसे!"
मी म्हणालों, "देव जाणे काय तें आहे पिसें."
ती म्हणाली, "याच वेडाची मजा आहे मुळी—"
मी म्हणालों, "बोलशी काही तरी तूही खुळी."

---

## ४२ अर्थोऽहि कन्या परकीय अेव

बाळ जा ! तप्ताश्रु हे येथेच ढाळूं दे मला,
जा गडे, कां हात आता घालिशी माझे गळां ?
आग्रहें तूझ्याच घेअीं दूध मी, याने परी
शान्त होअी काय हा जो डोम्ब चित्तीं पेटला ?
तें प्रसूतीचें न ठावें दुक्ख या साठीच का
लागती जीवास कन्यादान-दुक्खाच्या कळा ?
वाटतें लक्ष्मीच कोणी ने हृदींची चोरुनी,
दान मी केलें जरी मोठा करूनी सोहळा !
तूज पुत्राच्या ठिकाणीं मानिलें मोहूनि मी
कष्टलों की या जगीं लागोत ना तूते झळा.
सासरीं तूझ्या अता मी वागणें चोरापरी—
साङ्गशी काही तरी लाडांत की 'तेथे चला.'
तू स्मृती मत्प्रीतिची—आता न तू माझी अशी.
जागच्या जागींच मी चिन्तेंत तूझ्या वेगळा.
बाळ जा ! निष्काम सेवा सासरीं सौख्यें करीं,
कां न मातेची अशा कन्येस ती साधे कला ?
अश्रु कां नेत्रीं तुझ्या सौभाग्यसम्राज्ञी मुली ?
देख भावी स्वर्ग—माझा तोड, जाअूं दे लळा !
रम्यरङ्गी स्वर्ग तो अश्रूंतुनी भासे जसा
तो गिरी वृष्टींतुनी सौवर्ण तेजाने भला.
पूस डोळे, हास बेटा ! आणि जातांना असा
चुम्बनाने गोड सम्पो वास तूझा येथला.
अैक ! जा ! हाकारितें त्या मण्डपीं कोणी तुला,
राहणें आशाश्मशानीं यापुढे मी अेकला.

# ४३ प्रेम होओीना तुझ्याने

प्रेम होओीना तुझ्याने, प्रेम माझें राहुं दे !
आचरूं ये धर्म तूझा तू नि मी माझा मुर्दे.
  प्रेम होओीना तूझ्याने, दोष हा नाही तुझा,
  स्वस्थ राही तू सुखें, ठेवी न चित्तीं किन्तु, जा.
प्रेम होओीना तुझ्याने, प्रेम होओी का हटें ?
प्रेम द्या अन् प्रेम घ्या काव्यींच हा सौदा पटे.
  प्रेम होओीना तुझ्याने, दैव ही क्रीडा करी,
  वारि-भासाची मजा ती वालुकेच्या सागरीं !
प्रेम होओीना तुझ्याने, मी न दैवाला गणीं,
स्वप्नवत् राहील चित्तीं गोड माझी लागणी.
  प्रेम होओीना तुझ्याने, स्वर्ग थाम्बे स्व-स्थलीं,
  भूतलींची सम्पदा नाही अजूनी सम्पली.
प्रेम होओीना तुझ्याने, राख कां घालूं शिरीं ?
कां स्मशानाची कळा आणूं मनाच्या मन्दिरीं ?
  प्रेम होओीना तुझ्याने, जाअुं दे तें बापुडें !
  मत्स्मृतीला माळ तू घालूं नको वाया पुढे !

---

# ४४ भ्रान्त तुम्हां कां पडे ?

हिन्दपुत्रांनो, स्वतांला लेखितां कां बापडे ?
भ्रान्त तुम्हां कां पडे ?
वाघिणीचें दूध प्यालां, वाघबच्चे फाकडे. भ्रान्त०
हिन्दभू वीरप्रसू जी वैभवाला पावली
कां अता खालावली ?
धन्यता द्याया कुशीला अङ्ग झाडा, व्हा खडे ! भ्रान्त०
पूर्वजांची थोरवी लाभे पुन्हा बोलून का ?
झिङ्गुनी डोलूं नका;
लक्ष्य द्या चोहींकडे, द्या कालवैशिष्ट्याकडे ! भ्रान्त०
जीर्ण त्या कैवल्यकुण्डीं घाण देखा माजली,
डुम्बतां कां त्या जलीं ?
ओज पूर्वीचें न तेथे, तीर्थ तें आता सडे. भ्रान्त०
ज्ञानगङ्गा वाहते पूर्वेकडे, घाला उड्या,
अन्तरीं मारा बुड्या;
सम्पली पूर्वग्रहांची रात्र, झालें ताम्बडें. भ्रान्त०
मोकळी ही खा हवा, चैतन्य अङ्गीं खेळवा,
आत्मशुद्धी मेळवा,
मुण्डिती जे फक्त डोकें तेच गोटे कोरडे ! भ्रान्त०
श्रेष्ठता जन्मेंच का ये ? जातिदर्पाला त्यजा,
हिन्दुतेला या भजा,
नेमका कां भेद भासे ? साम्य सारें कां दडे ? भ्रान्त०
ब्राह्मणत्वाची बढाई लाज ही वेदास हो !
षड्रिपूंचे दास हो !
लोकसेवा, सत्यशुद्धी हीं कराया व्हा सडे. भ्रान्त०

कर्मयोगीं अेक व्हा रे, नायकी वा पायकी
दावुनी घ्या लायकी;
खानदानींतील नादाना, करीं घे फावडें. भ्रान्त०
जो करी कर्तव्य, घामेजूनि खाअी भाकरी
धन्य त्याची चाकरी !
कर्मजा सिद्धी ! न गीतावाक्य हें खोटें पडे, भ्रान्त०
लेखणी बन्दूक घ्या वा तागडी वा नाङ्गर
हिन्दवी व्हा चाकर;
अेक रक्ताचेच आहों साक्ष देअी आतडें. भ्रान्त०
अेकनाथाची कशी आम्हांस होअी विस्मृती
जो दया मानी स्मृती,
जो कडे घे अन्त्यजाचें पोर तान्हें शेम्बडें ! भ्रान्त०
सङ्कराची बण्डखोरीची उभारा या ध्वजा !
उन्नति स्वातन्त्र्यजा !
राजकी वा गावकी—सारीं झुगारा जोखडें ! भ्रान्त०
भारताच्या राअुळीं बत्तीस कोटी देवता
जागत्या, या पावतां
मुक्तिसङ्गें स्वर्ग लाभे—कोण पाही वाकडें ? भ्रान्त०
पोट जाळायास देव्हारे पुजारी माजवी,
अीश्वराला लाजवी,
चूड घ्या अन् चेतवा हें रूढ धर्माचें मढें ! भ्रान्त०
काय भिक्षेची प्रतिष्ठा ? चैन चाले आयती,
मुख्य दीक्षा काय ती ?
कष्टती ते खस्त होती पोळ साई-जोगडे. भ्रान्त०

'बुत् शिकन्' व्हा ! 'बुत्फरोशी' कासया वालाग्रही ?
भक्त व्हा सत्याग्रही !
मानिती वेड्यास साधु स्वार्थसाधू भावडे. भ्रान्त०

आचरा शान्तिक्षमा, निन्दोत ते जे निन्दिती,
संय्यमीला न क्षिती.
वैरबाधा खास दिव्य प्रेममन्त्राने झडे. भ्रान्त०

ही अहिंव्सा प्रेमनीती वाटतां नामर्दुमी
क्षात्रता दावा तुम्ही,
सोडवा क्षेत्रीं लढूनी राज्यसत्तेचे लढे. भ्रान्त०

दृष्टि राष्ट्राची हवी स्वार्थांतही जी नेहमी
उन्नतीची घे हमी;
जो अहिन्दी त्याजला ठेवा दुरी, चारा खडे. भ्रान्त०

बन्धुला हाणावयाला पत्करूनी दास्यही
शत्रु आणावा गृहीं.
दोष हा राष्ट्रघ्न अद्यापीहि देशाला नडे. भ्रान्त०

तो असो जैचन्द वा राघो भरारी वा कुणी
तो स्वराज्याचा खुनी !
हाकुनी धिक्कारुनी द्या त्यास सैतानाकडे ! भ्रान्त०

बन्धुलाही गान्जुनी जो शत्रुगेहीं मोकली
मूळ साक्षात् तो कली !
ना गणा त्याची प्रतिष्ठा, तें विषारी रोपडें ! भ्रान्त०

अिच्छितां स्वातन्त्र्य, द्या स्वातन्त्र्य हें अन्यासही,
का न कोणा आस ही ?
कां गुलामांचे तुम्हां सुल्तान होणें आवडे ? भ्रान्त०

'जो बचेंगे तो लढेंगे'! शूर दत्ताजी वदे,
स्वामिकार्यी जीव दे,
शौर्य हें दावाल का कळे मिशांचे आकडे ? भ्रान्त०
काळ राष्ट्रांच्या चढाओढींत लोटी खामखा,
अन्ध ऐशाराम कां ?
स्वर्ग जिङ्का वा मही ! ऐका रणींचे चौघडे. भ्रान्त०
कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला,
थाम्बला तो सम्पला !
धावत्याला शक्ति येई आणि रस्ता सापडे. भ्रान्त०
जा गिरीच्या पैल जा ! समृद्धि नान्दे वैभवें
तेथ सौन्दर्यासवें;
मोकळीकीच्या मुदें उत्कर्ष तेथे बागडे ! भ्रान्त०

* * *

हिन्द-पुत्रांनो, हिताचें तें तुम्ही हातीं धरा
एरव्ही माफी करा.
शब्द माझे बोबडे अन् ज्ञान माझें तोकडें
चित्त माझें भाबडें.

---

## ४५ कोण त्याला ना स्तवी ?

वानिती काव्यांत जेथे भाट सत्ता पाशवी,
जी जनांचा नाश वी,
कष्टुनी सञ्जीवनी प्रेरी स्वदेशाच्या शवीं
कोण त्याला ना स्तवी ?
राव होऊनी खपे राष्ट्रोन्नतीच्या साधनीं
तोच चित्तांचा धनी !

आस ठेवी अन्तरीं, येवोत विघ्नें आडवी कोण०
वाघिणीचें दूध द्या राष्ट्रास, घ्या त्याच्या बळें
ऋद्धिसिद्धीचीं फळें;
ही दिसे ज्याच्या प्रयत्नें आज आली पालवी कोण०
भूतकालांतील मिथ्या गौरवाच्या कारणें
पाडणें हीं कां रणें?
थाम्बवाया जो शिणे ही दुर्मतांची यादवी कोण०
सोङ्ग धर्माचें करूनी वावरे अन्याय कीं
मान्य हो ही नायकी;
पीडितांना उद्धरी जो न्हाणुनी प्रेमासवीं कोण०
स्तोम जङ्गी रूढिचें जो पार भङ्गाया बघे
तो जनांचे शाप घे;
काळ लोटूनी हिताची संस्कृती येतां नवी कोण०
काळसाक्षें जो यशस्वी क्रान्तिकार्यीं जाहला
कीर्तिला तो पावला,
खेचुं काळालाच पाहीं जो प्रयत्नें मानवी कोण०
भूप नक्षत्रांपरी उच्चासनीं हे शोभती
भव्य यांच्या नौबती;
शुक्रतारा जो पहाटेचा जणू किंव्वा रवी कोण०
जन्मदत्त श्रेष्ठतेला जो न डोकें वाकवी
तत्त्वनिष्ठेचा कवी
तो नसेना थोर जेवी बाण किंव्वा भारवी
तो सयाजीला स्तवी. कोण०

# ४६ सौन्दर्य-मोहन

प्राशितों सौन्दर्य तूझें मी दुरूनी
प्राशुनी पीयूष कां जातों झुरूनी ?
फाकते अिन्दुप्रभा चौफेर तूझी
आणि कां माझ्या मनीं ये काहुरूनी ?
आननीं हृद्रम्य सन्ध्याकाल-शान्ती,
नेत्र हे की हासरे तारे दिनान्तीं !
केश-वीची की भुऱ्या या मेघमाला !
की गुलाबांची मिळे देहास कान्ती !
नासिका नामी कळी ही आर्जवाची,
हासतां गालीं खळी रम्यार्थवाची,
हीं कुडीं कानीं तुझ्या का कृत्तिकांचीं
मौक्तिकें तेजाळ जीं व्योमार्गवाचीं !
हासशी, हास्यीं असें गाम्भीर्य कां गे ?
ओढिशी गुम्फूनि चित्तांतील धागे.
राहशी दिव्याङ्गने, निश्शब्द दूरी,
भोवतीं तूझ्या भ्रमूं हा जीव लागे.

# ४७ जीवघेणी लीला

जीवघेणी काय लीला ही तुझी !
दाव दासाला दया काही तुझी.
    कौतुकें केली किती ती चौकशी—
ही उपेक्षा मागुनी पाही तुझी !
    दों दिसांचा पूर की ओढ्यास ये—
ओढ गेली अेक सत्ताहीं तुझी.
    ध्येय तेव्हा मीच तूते भासलों
धुण्डितां दृष्टी दिशा दाही तुझी.
    काय अेका चुम्बनाने पालटे
वृत्ति अेकाकी रसग्राही तुझी ?
    शुष्क पुष्पासारखा मी यापुढे,
वायुवत् वृत्ती सदोत्साही तुझी.
    प्रेम तें काव्यात्म गेलें लोपुनी,
लोपली सामान्य मायाही तुझी ?
    अर्ज केला मी किती वेळा तुला,
दाद घेअीना अलेजाही तुझी.
    हिण्डणारा मी न दारोदार गे,
प्रेम तूझें भाकतों, द्वाही तुझी.
    अेरव्ही राजा स्वताचा मी असें
स्वेच्छया मानूनि दिल्शाही तुझी.

---

अलेजाही = उच्च पदाची स्थिति.

# ४८ मुक्त पक्षी

वेड आधी साङ्ग कोणी लाविलें ?
आणि डोळां गूज कोणी दाविलें ?
नेणता पक्षी मला पाहूनि तू
भोवती जाळें खुबीने टाकिलें.
शीळ ती अद्यापि या कानीं घुमे
ज्या शिळेने प्राण माझे ओढिले.
पार गेली मोकळीकीची स्मृती
पाठ दास्याचे तुवां जेव्हा दिले.
मी ममत्वें रङ्गलों गेहीं तुझ्या,
मी न जाऊं पाश होतांही ढिले.
आणि आता पारख्या सृष्टींत या
कां मला वाऱ्यावरी तू सोडिलें ?
काय रानें पाचुचीं आता मला ?
काय हें आकाश मौजेचें निळें ?

---

# ४९ निर्माल्य

पुष्प नामी तू लताग्रीं पाहिलें
डोलवीलें जाय जें मन्दानिलें.
तू पथें जातां खुडूनी लीलया
नीट अम्बाड्यावरी तें खोविलें.
स्वर्ग त्याला लाभला तेव्हा असें
धन्यतेचें हास्य पुष्पें दाविलें.
पुष्प कोठे आणि कोठे देवता !
पुष्प ताजें नित्य पूजेला मिळे.
सत्य हेंही, पुष्प ताजें कालचें
आजला तें होउनी जाओ शिळें.
तू स्वताच्या मात्र हौशी पाहशी,
कां तुला निन्दूं परी मी ऊर्मिलें ?
काल शीर्षीं आज तें पायीं पडे—
धिग् ! विधे, पुष्पासही तू नाडिलें !

—

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०८१
ता. ८-१२-३३
ठाणें

# ५० सन्ध्या-वारुणी

रम्य लाली अम्बरीं राहिली ही फाकुनी–
पाळथ्या पेल्यांत या कोण साण्डी वारुणी ?
  अेक या पेल्यामधे रङ्गली सन्ध्या मदें,
'घ्या !' रसज्ञांना वदे, 'घ्या सुरा नानागुणी'.
  काय काव्यानन्द तो रोमरोमीं स्पन्दतो !
जाहला सूरीन्द्र जो तो सुरेच्या या ऋणी.
  ही जणू विद्युल्लता काचपात्रीं नाचतां
अुर्वशीची कां कथा ? मोहिनी वाटे अुणी.
  संव्सृतीची काळजी घालवी तत्काळ जी,
फाटुं द्या आकाशही हीं क्षणीं त्याला तुणी.
  सिन्धुकन्या सुन्दरी स्वर्ग आणी भूवरी,
आदिशक्तीहूनि या सेव्य आहे का कुणी ?

---

सूरीन्द्र = शुक्राचार्य.    तुणी = रफू करून सान्धते.

# ५१ निशागीत

सर्वदा सञ्जीवनी तुझिया स्मितोत्सुक आननीं
वस्तिसूचक दीपिका जशि दाट दारुण काननीं.
प्राण हे मग कां असे डोळयांत येउनि बैसती ?
कां पडे मी संव्शयाच्या या अभद्र शरासनीं ?
हा असे वर्षर्तु, जीवन होय दुर्मिळ तें परी,
केधवा उसळूनि देअिल शान्ति गङ्गा या रणीं ?
मी अतन्द्रित या निशागीतें करी आराधना,
सुप्त मूकच तू तुझ्या त्या स्वर्गसुन्दर दालनीं.
स्पष्ट विकृत साअुली मम अेक हो सहचारिणी,
हासुनी हिणवी मला ज्योत्स्ना अवेळीं श्रावणीं.
चन्द्रिकेंत सुशान्त या हिन्दोल जावा गाअिला.
मेघडम्बर माजवी मल्हार तों माझ्या मनीं.
प्रीतिची ठिणगी असे गारेंतही, न तुझ्या हृदीं;
माझिया हृदयीं स्फुरे बघ ती जशी चपला घनीं.
गे अुषेपरि रागरञ्जित केधवा होशील तू ?
चन्द्रिकेपरि धौत या असशीच सुन्दरता-खनी.
माझुनी हृदयीं अराजक दुर्दशा बघवे न ही;
बैस हृत्पद्मासनीं, कर शान्त मारुळे साजणी !

४८३७

## ५२ कमाल

नमोऽस्तु ते ! जयोऽस्तु ते ! हिरण्यगर्भ भास्करा !
सुवर्णपाद लावुनी करी पवित्र अुम्बरा.

करीत अर्घ्यदान मी त्रिवार तूजला नमीं,
विभूति मिल वन्द्य तू प्रकाशकांत अीश्वरा.

स्तवी तुलाच पारशी करीत याचना अशी,
प्रकाश पाड मानसीं प्रकाशवंत अम्बरा.

विहङ्गसूक्तगायनें घुमूनि राहिलीं वनें,
सरू डुलूंनि वारिती तुझ्यावरूनि चामरां.

करूनि शान्त जङ्गलें नभांत मेघ पाङ्गले,
प्रभातरङ्गमङ्गलें प्रसन्न हो वसुन्धरा.

निसर्गदेवता नटी, घटी कटीस पोपटी,
न अुत्सवास ओहटी, भरे मनांत सुन्दरा.

कभिन्न वृद्ध हे गिरी, शिखा न यांचिया शिरीं
विशाल शाल अञ्जिरी लपेटिती महोदरां.

पहा सुवर्णचम्पका—टपोर चित्तचुम्बका—
बहार पारिजातकावरील ओसरे जरा.

फुले मजेंत तेरडा, खुले तजेल केवडा,
सुगन्ध मन्द विस्तरी जगांत वात नाचरा.

गमे सुदीर्घ माण्डवामधूनि जाय कालवा,
कडेकडेस वाहवा ! फुले विचित्र फुल्वरा.

अभूतपूर्व वैभवें निसर्गरूप हें नवें
तुला न वा नवे कवे, जुळूं नकोस अक्षरां.

निनादतात चौघडे, विशेष काय हो घडे ?
तुरुष्क-शत्रु तो पडे फजीत, चीत, घाबरा.
प्रभाव दाविला निका तुवां कमाल सैनिका !
पिटूनि काढिलें ग्रिकां, मदान्ध देशतस्करां.
जुनाट राष्ट्रतारवा सुधीर तूच नाखवा,
बळें अचाट फोडिला भुकेल शत्रु-भोवरा.
अपूर्व राजकारणीं समर्थ एक तो धणी,
न हो परावलम्बनीं कुणीहि मित्र, सोयरा.
स्वराष्ट्रतत्त्व दाविशी, न धर्मभावना पिशी,
रणीं अरींस दापिशी, परी न रक्तहावरा.
तुझी उदार मर्दुमी, हुशार धूर्त रुस्तुमी
किती म्हणून वर्णु मी ? तुझा दिगन्त अस्करा !
कवी नवीन हिन्दु मी, कुठे कमाल तू रुमी ?
परन्तु लोकशाहिचा सदा शुभेच्छु मी खरा.
तुला म्हणूनि मी स्तवीं मराठबोल अैकवीं.
सुधारणा स्वतन्त्रता परस्परांस आसरा.
प्रसिद्ध तू रणाङ्गणीं तसाच राजकारणीं,
सुधारकांत अग्रणी कमाल तूच मोहरा !

---

रुस्तुमी = शौर्य. अस्करा = कीर्ति. रुमी = तुर्क.

## ५३ वसन्त-कला

रसज्ञ हो, पहा वसन्त पातला,
घरांत खन्त कां ? अुठा फिरायला.
कुअू ! न काय आर्तशब्द अैकु ये ?
स्वरांत गूढ हाच सूर आगळा !
हवें कशास वस्त्र ? अूब अग्नि दे
निसर्ग-होलिका-महोत्सवांतला ?
विरक्ति कां जरा-दशेंतली वृथा ?
करा विरक्तिभाव दग्ध आपला.
बघा पलाश-शाल्मली फुलूनि हा
सु-रक्त यौवनानुराग फाकला.
वसन्त लागणी जिवन्त ही करी,
शिके बनूनि शुक्रशिष्य का कला ?
सभोवती बघूनि चारुता नवी
जिण्यास कोण हो विटे ? वदा मला.
कुढायचें रडायचें अता नको !
क्षणैक घ्या हसूनि हासवा, चला !

---

# ५४ सन्धि-काल

वाट किती पाहुं तरी ? धीर निघेना मधुरे,
गूज कथूं का मनिंचें ? तूज कळे तें चतुरे.
सान्ज किती रक्त पहा ! रङ्ग फिका होअिल हा,
मन्द अुजडोंत अता सन्धि-घडी अर्ध अुरे.
या गिरिकुक्षींत तळीं गाव जणू बाळ निजे,
मञ्जुळ घण्टारव हा सूचवि गोठ्यांत गुरें.
पश्चिमवायूसह ये गीतलकेरी दुरुनी,
स्पष्टच हे शब्द मधे पाळुपदीं—'बाल मुरे.'
हाय ! तुझ्या प्रीतिविणें निष्क्रिय हें जाय जिणें,
मन्त्र तपस्येविण तो होअुनि निस्तेज झुरे.
रूक्ष सडा निर्जन हा तूजमुळे रम्य अहा !
नाहि तरी सर्व जगत् नीरस भेसूर भुरें !
काय तुझ्याहूनि मला हो प्रिय ही काव्यकला ?
कीर्ति नको, घालुं कुणा घेअुनि मी हारतुरे ?
भूवर का मत्स्य जगे ? तूच मला जीवन गे,
अिन्दुमुखी, सिन्धु नको, बिन्दु मला अेक पुरे !

## ५५ अबोला

मानिनि, जाणार तुझा राग कधी ?
हास गडे, बोल गडे, कां अवधी ?
  तापुनिही बोल, सुखें साहिन तें,
दुस्सह हा होय अबोला अगदी.
  बोल अुधारी न कुणालाहि रुचो,
त्यास गणीं अैवज मी गे नगदी.
  पाप तयाचें बघ तूझ्याच वरी,
मौन जरी गुप्तपणें जीव वधी.
  तू तिकडे, मी अिकडे आणि मधे
काय वहाणारच निश्शब्द नदी ?
  थाम्बुनि दोघेंहि दुरी हे पडलों,
सूचवि काहीच न का सप्तपदी ?
  वाट बघे मी, न बघे काळ परी,
दे न पुन्हा हा क्षण तो निर्दय-धी.
  खूण जराशीच करी तू नयनें,
पोहुनि येअीन तिथे मी जलदी.

## ५६ लाज जरा, हास जरा !

लाज जरा, हास जरा, हास तू !
लाजव या मत्त गुलाबांस तू !
दर्प अशांचा करण्याला दुरी
सोड तुझे सार्थ मधूच्छवास तू.
तू गमशी शान्तिमयी कौमुदी,
दिव्य अुषा मूर्तिमती आस तू ?
वारितरङ्गावर नाचे प्रभा
दाव तसे स्निग्ध सुखोल्लास तू.
इन्दुकलातुल्य तुझें लाघव —
छे ! द्युतिची तू लहरी, रास तू.
बाह्य अलङ्कार तुला कासया ?
गौर मुली, मङ्गल आरास तू !
हारित हारीसच येअील गे
दाखवितां त्यास पदन्यास तू.
मित्रसुता प्रीतिलता का कुणी
बालकविस्फूर्ति चिदाभास तू !
शक्य असे काय तुझी विस्मृती ?
जागविशी आन्तर विश्वास तू.
रूक्ष विरागीहि मनीं तत्क्षणीं,
पालविशी प्रेम निरायास तू.
बोलुं नये शब्द खरा, बोललों,
गे न करी अर्थविपर्यास तू.
मानस तू, मान मला हंस गे,
गे पतिताला शिवकैलास तू !

## ५७ तुझ्यावीण

तुझ्यावीण कुठे जाऊं ? कसा राहुं तुझ्यावीण् ?
हवा तू तर मी पक्षि, नदी तू तर मी मीन्.
लतेवीण जसा कुञ्ज तुझ्यावीण तसा मी,
तुटे तार तरी व्यर्थ पडे केवि पहा वीन्.
कधी लोभ कधी क्षोभ, तऱ्हा अेक न तूझी,
कधी प्रेमळ वाचाळ, कधी मूक अुदासीन्.
कधी अुद्धत रोखूनि तुझी दृष्टि पहाशी,
अधोदृष्टि कधी व्यक्त करी अन्तर शालीन्.
तुझी वृत्ति अशी चञ्चल दे थाङ्ग न लागूं,
तरी पाडुनि मोहांत करी दास मला दीन्.
तुझा अङ्कित होण्यांस मला मानच वाटे,
जरी तत्त्व खरें हेंहि जिणें नीच पराधीन्.
नको लोटुं मला दूर, करी आन हवें तें,
तुझे छन्द सुखें सन्निध मी साहुनि राहीन्.
कधी दूर न तू दर्पण राहूं निज देशी,
तुझा मित्र असा मी जड अैन्याहुनि का हीन् ?

# ५८ वन-बाला

भिल्लीण न तू सुन्दरि, बाणा न शिकारी—
कां मारिशि गे बाण असे तेज जिव्हारीं ?
मी होउनि होऔं वश तूते वनबाले,
आकर्ण धनुष्यें तर कां व्यर्थ तयारी ?
हें सावज जाअील भिअूनी न पळूनी
हा बाण विषारी जरि काळीज विदारी.
लावण्यलता तू ललिता, यौवनमत्ता !
काही कर तू माफ तुला ! तू अधिकारी !
खेळांत तुझ्या काय मरावेंच असें मी ?
ही और तुझी जादुगिरी गुङ्गविणारी !
उद्दाम मरुद्दीचिपरी झोक तुझा हा,
दे मान तुला वाकुनि समृद्धि शिवारीं.
साण्डेल गमे तेज असा रङ्ग बघूनी
शाहीर करी खेदच, मी कां न चितारी ?
काढील हुबेहूब कसें चित्र चितारी ?
बाधेलच त्यालाहि झणी अिश्क बिमारी.
अुत्फुल्ल मिजाशींत पदें टाकित जाशी,
मार्गांत किती लोळण घेतात बिचारीं !
मी भक्त भिकारी तर राणी कमला तू,
चुम्बूं मजला देअि तुझी घोळ किनारी.
बेमोल पहा प्रेम हृदीं साठुनि राशी,
कां व्यर्थ मला मी समजूं क्षुद्र भिकारी ?
या दाट चराअीवर तू गौळण राधा,
मी कां न तुझा राजस तो नन्द-खिलारी ?

---

# ५९ रान-किशोरी

श्यामाच म्हणूं काय तुला श्यामल पोरी ?
रम्भा परिरम्भांत कशाला हिमगोरी ?
हातांत विळा आणिक डोईवर भारा,
साक्षात् श्रमदेवीच दिसे आज समोरी !
तू फोक अजू पातळ, हा झोक बघूनी
केळीस जडे शोक, नुरे मागिल थोरी.
चालींत खुले ताठर ही अैट पहाडी,
अुत्फुल्ल अुरीं सुन्दर सङ्गीन मुजोरी.
हीं सूचवितीं सोशिक कष्टाळु भलाअी
नेत्रें गहिरीं भेदक तेजाळ टपोरीं.
साधेच पहा बाहुवटीं वाकरवाळे,
जें सुन्दर जात्या, न लगे त्यास छचोरी.
हां थाम्ब ! कुठे हारवला हृन्मणि माझा ?
कोणास पचे काय अशी नाजुक चोरी ?
वैकुण्ठ कुठे अन्य, अिथे तू जर लक्ष्मी ?
मी पाटिलराणा तर तू रान-किशोरी.
काळींत खपूं ये चल अन् देवदयेने
होतील सुवर्णापरि हीं काजळ-खोरीं.
विस्तीर्ण तळें पूर्ण जळें, आंत तराया,
रायाहि जणू चौकट अैन्यास बिलोरी.
छायाळ अशा आम्रतळीं बैसुनि सोडूं—
कार्मारिण तू सुग्रण—तूझीच शिदोरी.
जाशील परी तू तर संव्सार कशाला ?
लेअुनि फिरावें कफनी, माळ, कटोरी.

## ६० तेथे चल राणी

कोठे तरि जाऊं बसुनी शीघ्र विमानीं
अज्ञात ठिकाणीं
स्वातन्त्र्य जिथे, शान्ति जिथे, प्रेम अिमानी
तेथे चल राणी ! तेथे०
सामाजिक सम्बन्ध सखे, हे न टिकाऊ;
हे स्नेह दिखाऊ !
मी तूज, मला तू, प्रभु दोघांस निदानीं तेथे०
भाळे न अिथे प्रीति धनावीण कुणाला,
ना मोल गुणाला;
लावण्य नसे जेथ जणू चीज किराणी, तेथे०
व्हा बद्ध अिथे, प्रेम करा वा न कराही,
नातें दृढ राही;
गे लग्नविधी जेथ न जीवैक्य-निशाणी, तेथे०
नातें पुरुषस्त्रीमधि तें अेकच वाटे,
अैसें उफराटें
ज्यांचें मत त्यांचें वच यावें नच कानीं, तेथे०
डोळ्यांत अिथे लाडिक जादू परि खोटी,
अन् संशय पोटीं;
साधेपण जेथे न गमे गूण अडाणी, तेथे०
काहींहि करा ही जनता मारिल नाङ्गी
हासूनि अपाङ्गीं;
ध्येयास पुरा वाव मिळे, होय न हानी, तेथे०
स्वातन्त्र्य न सत्तेविण, सम्भाविततांही
दम्भाविण नाहीं;
स्वार्थापुरतें सत्य न जेथे कुणि मानी, तेथे०

अन्याय अिथे जोंवर अन्यास जहाला
तों त्रास कशाला ?
जेथे न शिणे केवळ लाभास्तव वाणी, तेथे०
ही चैन अविश्रान्त, वडेजाव विकाअू
टाकूनिच जाअूं ;
स्वाभाविक कष्टाळु जिथे रम्य रहाणी, तेथे०
ये कोठुनि कष्टाविण विश्रान्ति दिनान्तीं,
धर्माविण शान्ती ?
स्वादिष्ट सुधेहूनि जिथे भाकरपाणी, तेथे०
काव्यें नकलीं नीरस वाचूनि जिवाला
वाटे न जिव्हाळा;
फेसाळत गाअील जिथे ओहळ गाणीं, तेथे०
कोठूनि गरीबी असतां रानफुलांहीं
शृङ्गारित राअी ?
बेमोल जवाहीर खुले रात्र-वितानीं, तेथे०
कोठे तरी रानांत वसूं या नि हसूं या,
जेथे न असूया !
सन्तोष पडूं दे न कुठे न्यून निधानीं, तेथे०
बान्धूं चिमणें खोपट की अूब जयाची
दैवी प्रणयाची !
आल्या अनिकेतास खुलें स्वागत रानीं तेथे०
अङ्कावर खेळूनि शिकूं सृष्टिसतीच्या
आत्मप्रगतीच्या
त्या गूढ कथा ज्या न कुराणीं, न पुराणीं. तेथे०

## ६१ सुधाकर

होतास कसा मित्र निका तू!
गेलास परी सोडुनि कां तू?
  भङ्गूनि सख्या, योगसमाधी
केलास जगद्रङ्ग फिका तू.

तो घाव बसे खोल जिवाला,
होतेंच नकोशी परि काळा;
  हें प्रकृतिचें पाप पहा की
सृष्टींत नसे नित्य हिवाळा.

तों गाढ तमीं हा शशि येअी,
स्वारस्यसुधा ओतुनि देअी;
  तत्रापि सख्या, ये! बघ केवी
पूर्वस्मृति चित्तांत ठसे ही.

येअील पुन्हा तीच अुषा का?
चित्तींच रहा अैकत हाका!

---

## ६२ सखये, काय करूं मी ?

सखये, काय करूं मी ? मज काहीच सुचेना,
तुजवाचूनि मला वाचन वा खेळ रुचेना.
दीर्घसूत्री रजनी घालवितों मोजित तारे,
न सरे ही अजुनी, कोठवरी होअिल दैना ?
जरि घूत्कार घुमे हृत्कुहरीं निर्जन आता
ये अुषे, सूक्त तुझे गातिल गे कोकिळ-मैना.
रुचि त्या दिव्य मुखाची विलसो मन्दिरिं माझ्या,
पार पाडेल तमींची भितरी संव्शयसेना.
निजरूपींच जरी तू रुचिरे, रङ्गुनि जाशी,
घे हृदीं या हृदयाचा सखये, निर्मळ अैना.

---

## ६३

प्रेम-पाशांत कसा मी पडलों तू पुसशी,
न शकें अुत्तर द्यायास म्हणूनी हसशी.
प्रेम नाहीच कुणाही वर माझें म्हणतां
रक्तिमा आणुनि गालीं दुरि जाशी, रुसशी.

---

[library stamp]

## ६४ चन्द्रिका का प्रिया ?

व्यर्थ पूर्वी म्हटलें की मज दे भेट यमा !
म्हणतों आज, रहा दूर वसे जेथ अमा.
मार्ग सम्पूनि दिसे आज परन्धाम अिथे,
प्रीतिची ही न मुळी जीवनयात्रा सुगमा.
चन्द्रशाळेंत कशी शान्त सुधा ही विलसे,
आणि येती भरुनी सर्व जिवींच्या जखमा !
हासुनी तू पुसशी, कोण चमत्कार करी ?
पौर्णिमेची न दिसे काय तुला ही सुषमा ?
दे न मानेस असा निर्दयतेने झटका !
पौर्णिमा मूर्तिमती तू, नच पूर्णेन्दुसमा !
काय दावी नखरा राग तुझ्या गोल मुखीं !
स्पष्ट हो त्याज्य किती ही झिजलेली अुपमा !
कौमुदीने फुलुं दे मत्त मुदें हीं कुमुदें,
हृत्सुमाला फुलवी अेक तुझी चारु कमा.
वैभवाच्या शिखरीं जे बसती ते पुसती,—
ध्येयजीवी तरुणा, तू करिशी काय जमा ?
सुज्ञ हो, काय खुळा हा ! म्हणुनी तुच्छ गणा;
चित्कला ही मिळतां काय हवें आणिक मा ?
तू नको हासुं सखे, काय तरी हा बरळे !
चन्द्रिकेहूनिहि तू अेकच हृद्रम्य रमा !

---

अमा = अमावास्या. मा = मग.

## ६५ सौभाग्यवती

भावपुष्पें फुललीं हीं मधु अन्तर्यामीं,
वाहुं कोणास तुम्हांवीण दुज्याला स्वामी?
   या करा धारण हीं ! ये न पुन्हा सन्धि अशी,
काळही खेळुं बघे फुल्ल अशा आरामीं.
   देवपूजा मजला कां कथिती धाधाया?
नाथवेडें मन हें हाय रमेना रामीं!
   दृष्टि माझी म्हणती की नच विश्वव्यापी,
विश्व तुम्हांत समाविष्ट तुम्ही हृद्धामीं.
   सर्व सौभाग्य तुम्ही अेक मला हें दिधलें,
स्वर्ग शङ्कास्पद तो काय मला आगामी?
   हाक मारीन कशी अन्य कुणाला, तुम्ही
पाठिराखे असतां संसृतिच्या सङ्ग्रामीं?
   गोड सेवा करुनी घ्या, न विनन्ती दुसरी,
लाभलें सर्व; दुजी आस करावी कां मी?

---

## ६६

तूजवाचूनि सुनी नीरस जाअी रजनी,
हृत्कले ये गगनीं!
मी तुझी स्वप्नछबी काढित बैसे शयनीं,
दृष्टि तूझ्या वदनीं.
   पञ्जरीं कोण्डुनि चण्डोल न कां तद्भाषा
   अैकशी आताशा?
कोणता बुल्बुल मोही तुज नामी कवनीं? हृत्कले०

---

# ६७ बालमित्रास

शैशवींचा सहज स्नेह पुन्हा
केवि कोठें जडणें तो अधुना ?
भोवतीचे जन हे सुज्ञ किती—
विश्वसीना कुणि चित्तांत कुणा.
खेळिमेळींत घडी जाय, पुरे !
मैत्रिकीचा विलसे हा नमुना !
दृष्टि सर्वत्र सुवर्णीच कशी,
न बघे कोणिहि अन्तस्स्थ खुणा.
मित्रनिन्दा करणें आडुनि ती;
शिष्टपन्थीं नच हा होय गुन्हा !
अन्तरींचा सहज स्नेह तयां
जन्म त्यावाचुनि वाटे न सुना.
आणि होशी मज कौमार-सख्या,
हेमगर्भासम तू मित्र जुना.
काय मागूं ? अस कोठेंहि दुरी,
अितरांच्याच सुखें फेड ऋणां.
प्रीति तूझी स्मरतों, हीच पुरे,
प्रभुची ही मज वाटे करुणा !
सुख तूझ्या स्मरणींही किति हें !
पुण्यशीला, किति रे मीच अुणा !

## ६८ जातांना

निमालीच का माया ? कशाला दुरी जाशी ?
पुन्हा स्नेह सम्पादूं कसा आणि कोणाशी ?
तुझ्यावीण या रातीं मला कोण साङ्गाती ?
मुखेन्दूच तूझा हा जगीं या तमोनाशी ?
तुझ्या सङ्गतीं गेलीं सुखाचीं किती वर्षें !
स्मरूनीच राहूं का गतप्रीतिच्या राशी ?
तुझ्या सङ्गतीं जीं जीं मला लाभलीं श्रेयें
न तीं खोल पाताळीं, न तीं उन्च आकाशीं.
कृपेची तुझी दृष्टी करी जी सुधावृष्टी
वसे ती न वैकुण्ठीं, असे ती न कैलासीं.
तुझ्या प्रीतिची ज्वाला करी शुद्ध जीवाला,
नको जान्हवी-रेवा, नको द्वारका-काशी.
नको जाउं टाकोनी, नसे या जिवा कोणी,
अता भार का झालों ? तुवां गोविलें पाशीं.
बरें, जा हवें तेथे, तुला दैव हें नेतें,
परी देवि, जातां जा मला देउनी आशी.

# ६९ प्रबोधन

जहाली अुषा जागी, सखे, तूहि हो झणी,
अुषेसारखा अुभ्री करी साज साजणी.
तिचें रूप दावाया बने सिन्धु आरसा,
पहा तू वहारीचा तुझा इन्दु दर्पणीं.
अुषेसङ्गती भानू धुक्यांतूनि ये वरी,
स्तवूं यास सूक्तांनी, असे रम्य पर्वणी.
'फिरा या मऊ वेळेवरी वा गिरीवरी,
उठा प्रेमयुग्मांनो,' सखे अैक अश्रणी.
समुद्री हवा खारी सुखें सेवुनी फिरूं,
वनश्रीस भेटूं या—सती पूज्य देखणी.
लपूनी लताकुञ्जीं करूं प्रेमकूजितें,
पडूं वा सुखारामीं हरित् शाद्वलाङ्गणीं.
तिथे फूलझाडांचे उभे दाट ताटवे,
तुझी वेणि गुम्फाया करूं पुष्पसञ्चणी.
म्हणूं अेक आवाजें तुझ्या आवडींतली
खऱ्या प्रेमलीलेची रसोदात्त लावणी.
गुलाबी प्रभातींची असो झोप साखरी,
पुरे सोङ्ग हें आता, झणी अुठ साजणी.

—

वेळा = वालुकामय समुद्रकाठ. अश्रणी = अशरीरिणी वाणी.

# ७० अखाणा

गडे, नको छळुं आता, सुचे न नाव, अखाणा,
पहा न्यहाळुनि माझा खट्याळ राजस राणा.
अशो नसो कुणि पाशी, हसे रमे अपुल्याशी,
लबाड चोखित बोटें पडे मजेंत अुताणा.
पहा कसा टक लावी, कुतूहलस्मित दावी,
तया कळे जणु सारें—खराच बाळ शहाणा !
मुके पटापट याचे कितीहि घ्या न चिडे हा—
सदा फुलापरि तान्हा प्रसन्न गोजिरवाणा.
परन्तु वेळ जहाल्यावरी न गप्प बसे हो !
घरास गर्जुनि सोडी हटेल दावुनि बाणा.
पुढेहि आस असे की प्रभाव दाविल शेर्वी—
अुडेल उन्च भरारे जसा हवेंत ससाणा.
अमोल भूषण गेहीं नि खेळणें अमुचेंही,
प्रमोद शुक्तिस वाटे बघूनि मौक्तिक-दाणा.
असेंच भावपटाचें पुढे पुढे विणणें हो,
कुमार त्यांतिल बाणा, नि कोण ओळख ताणा ?

---

बाणा = वस्त्राचा आडवा धागा. ताणा = अुभा धागा.

# ७१ अगोटींची भेट

अगोट लागुनि ही तरं जाहली धरणी,
सजे जशी हिरवा शालु नेसली सजणी.
  नदी कषायित धुन्दींत चालली फुगुनी—
नव्या वयांतील ही ओढ, ही कशास गणी ?
  पडूनि झिमझिम पाऊस धुन्दतात दिशा,
मलाहि होय कसेसेंच लागुनी झुरणी.
  इलूं नयेच अिथूनी, भिजे, भिजो तनु ही !
करूनि धीर रिघावें कुणाचिया शरणीं ?
  कितीक साठवणी पूर्वसौख्यदुक्खाच्या,
खुल्या करूनि कथाव्या कुणास आठवणी ?
  असा निमग्न विचारांत कातळावर मी
पुढूनि आलिस तों तू चढूनिया चढणी.
  चपापलों तुज देखूनि, लाजलोंहि जरा,
पुढे मनीं भय—अेकान्त आणि तू रमणी !
  विभागवी स्मित अव्याज ओठ हे चिमणे,
लघाळ दृष्टि करी हाय जादुची करणी !
  विशाळ निर्मळ इन्दीवरें तुझ्या नयनीं,
गुलाब-गाल फुलूनी बहार मैतरणी !
  सुरेख अुन्नत सङ्गीन गुच्छ हे असुनी
न नम्रता तनुला ये, न मन्दता चरणीं.
  तनूंत राजस तारुण्य मुस्मुसूनि निघे,
परन्तु तू हरिणी जी अुडे खुल्या कुरणीं.
  तुझें स्मित क्षण विश्रान्तिचें गमे स्थळ हें,
जसें जिवन्त हरिद्-द्वीप रूक्ष शून्य रणीं.

वघूनि हें स्मित मी दङ्ग गुङ्ग होय जसा
श्रवूनि मञ्जुळ पुङ्गी डुले रसज्ञ फणी.
तथापि रोख कळेना तुझा, कळेल कसा ?
कशास लाविशी माया जिवास या गडणी ?
कुठे भणङ्ग खुळा मी, कुठे रमा ललिता,
अमोल पाचच तू मी भिकार काचमणी.
स्मितांत निर्मळ तूझ्या असें बुडूं मज दे,
तरूनि जाअिन वेगें भवाब्धिवैतरणी.
तुझ्या स्मितांत मला स्वर्ग भूवरी दिसतो
परी अशा कुणग्याचा कळे न कोण धणी ?
तुझ्या स्मितास कसें आज देअं अुत्तर मी ?
पटेल काय तुला तें पडूनिही श्रवणीं ?
असाच लोभ असूं दे! कधी तरी पुढती
कथीन हृद्गत माझें करीत आळवणी.

---

## ७२ ठुमरी

फिरावयास हवाशीर थण्ड या प्रहरीं
सजूनि ये कुणि तन्वी–जणू अुषा हसरी!
सफेत पातळ, बेतीव पोलकें गहिरें,
अखूड नाजुक छत्री, नि बूट ते रबरी.
भिजूनि सौम्य अुन्हाने हसे सस्तिट हा,
फुलूनि येअुनि रङ्गांत तेरडा-तगरी.
पडूनि चादर बान्धावरूनि पाण्याची
गभीर घोष घडाडूनि कातळास करी.

अखण्ड घालिति फेऱ्या हवेंत पाकोळ्या
तशी सलील हिची वृत्ति नाचरी लहरी.

बसे अिथे क्षण, तेथूनि जाय ही उडुनी,
खुडूनि पुष्प जशी घे तशीच चित्त हरी.

गतींत मोहक चाञ्चल्य, काय हा नखरा!
म्हणूं कबूतर हीतें, पतङ्ग का भ्रमरी?

चुणींत माणिक का प्रेमि-रक्तबिन्दु म्हणूं?
स्वतःस वेष्टुनि घे अेकपेड ही कबरी.

निसर्गसिद्धच सौन्दर्य हें हिचें आधीं,
तशांत साह्य तऱ्हा या नव्या कलाकुसरी.

दिसे मुखावर ही बेगुमान अैट किती!
नवीन शिक्षण, सम्पत्ति अन् हवा शहरी.

चलाख बेडर डोळ्यांत अिन्द्रजाल पहा!
स्मितांत लाघव जिज्ञासु, गूढ ही जबरी.

खुशाल लाडिक हास्यास या दुजा भाळो,
हवेंत जीव तरङ्गो फुगूनि हावभरी.

बघेन रूप दुरूनीच मी तुझें विजली,
तुझा प्रसाद कळे गे असे कसा जहरी.

जिवास विन्धुनि ठेवी जिवन्त हग्शर हा—
न ये रुजूनि तुझा घाव लागतां कहरी.

पुसेल कोण मला? ख्याल भावमन्थर मी!
हळूच हृत्सुमनीं नाच तू परी ठुमरी!

---

## ७३ स्त्रीस्वभाव

"तिच्यासमक्ष न ये ओळ अेकही रचितां,
पहा परन्तु परोक्षीं स्फुरे गड्या, कविता.
अगम्य आणिक तेढा किती स्वभाव तिचा!
वियोगशासन दे ती रुसूनि याकरिता.
रुचे कवीहुनि कां काव्य, वस्तुहूनि छवी?
रुचे न भाव मुका कां असूनि खोल जिता?
तिला वियोग कसा सह्य हो जरी कवनीं
स्मृतींत मोहक नावीन्य होय दाखविता?
तिच्या समोर मला प्रीतिचेंहि भान नुरे
म्हणूनि काय गमे तीस भाव-कोश रिता?
अवर्णनीयच तो तत्प्रसाद, काव्य पळे!
वियोगतापच काव्यास हाय हो जनिता!
विचित्र सिन्धुपरी स्फूर्ति ही, हिला भर ये
द्रवे हिमाद्रि जशीं चण्ड तापुनी सविता.
तशींच रङ्गुनि धावे असीम होअुनि ही,
किती भयानक लावण्य दाखवी सरिता!
त्यजूनि मानसकासार—चारु दर्पण की!
रुचे कषायित कल्लोलिनी कशी ललिता?"
"अरे असूनि कवि स्त्रीस्वभाव नेणशि तू!
वृथा न ती कवनीं प्रीति दाखवी वनिता.
रुचे न गुप्त म्हणूनी सरस्वती तरुणां—
मरीचिकाहि रणीं मोह पाडिते तृषिता.
'गडे, किती किति हें प्रेम मी करीं!'—वच हें
सदैव आतुर अैकावया असे दयिता."

# ७४ कां सङ्कोच ?

" पुरे गडे ! किति सङ्कोच ? ये अशी जवळी !
मुखावगुण्ठन सारूनि हृज्जगत् अुजळी ! "
—परन्तु दर्शन घ्यावें गमे दुरूनिच मी,
दुरूनि गुञ्जन अैकेन मी कळी कवळी.
तुम्हांस दावुनि हृद्रङ्ग द्यावया मधुही
असूनि आतुर मी आंत दावितें अुकळी.
प्रफुल्ल होअुनि होणें पुढे विशीर्णच ना ?
करी मला न पहा भीति ही परी दुबळी.
जगत् कृतघ्न असो हें लबाड पोटभरू.
असे पतङ्गहि, सारेच का अली कमळीं ?
परी मला भय वाटे, दुरूनि रम्य दिसे
दिसेल काय तसें रम्य पोचतां जवळी ?
मला दुरूनि तुम्ही ध्येयमूर्ति की गमतां,
करी बहार जगीं हीच भावना सगळी.
असो कसेंहि जगत्, ध्येय त्या परी न दिसो !
जिवास जाळिल नैराश्य वा सदा अनळीं.
हृदीं परन्तु सख्या, हीहि पोखरी चिन्ता—
जिवन्त राहिल कैशी मिटूनि नित्य कळी ?
अुद्या दिसेल मला तें भलें अुद्याच दिसो.
लुटूनि घ्या अजि अैश्वर्य हें सहस्रदळी.

## ७५ ढोङ्ग

तुझाच दास नि लागे सखे, तुझ्या पाठी ?
छळी तुला नि म्हणे, सर्व हें तुझ्यासाठी ?
  खरेंच, अन् बघशी तूहि त्यास टाळाया
अचूक तों पडती तूमच्या पुन्हा गाठी ?
  म्हणे, 'नको मज माझें, तुझें हवें,' तूते
कळे न भाषण भाषा असूनि मह्राटी ?
  विनन्ति, कोप, अुपेक्षा, तिरस्कृती वाया ?
हसेच धीट बघूनी कपाळची आठी ?
  कितीहि वाग्शर मारा, कितीहि धिक्कारा,
तथापि लोचट मोठा कशास ना गाठी ?
  कथूं अुपाय तुला मी बरोबरीची का ?
पहा, खुल्या करुं तूझ्या मनांतल्या गाठी ?
  अगे बिलन्दर पोरी, करूनि ही चोरी
पुन्हा अशी करिशी काय तूच हाकाटी ?
  तुवां अगोदर हृद्रत्न चोरिलें त्याचें,
न जें मिळे धन वेचूनिही कुणा हाटीं.
  न होय माफ गुन्हा हा, खुशाल तर्कांच्या
अुड्या पटापट तू मार येथ कोल्हाटी.
  अुपाय अेकच, हृद्रत्न दे तुझें त्याला,
जरी असेल ठिकाणीं, करी फिटम्फाटी.
  पुरे पुरे रुसवा ! सोङ्ग ढोङ्ग मी जाणें,
दुरीच बैस, अुन्हाळ्यांत कां तुझी दाटी ?

## ७६ प्रेमशूर

हाल काय दासाचे, काळजी न खावन्दा,
मी परी तुझा झालों स्वामिनी, खडा बन्दा.
जन्मभूमि सोडूनी आप्तपाश तोडूनी
देहदुक्ख जोडूनी जाहलों परागन्दा.
ही न शेज पुष्पांची, खाच मात्र काट्याची,
लुप्त हीत झालेल्या शोधितों मनोगन्धा.
तावुनी सुलाखोनी प्रीत घे महाराणी !
खूण अन्तरींची घे, दोष दे न या फन्दा.
प्रीत ही पतङ्गाची लाट का अनङ्गाची ?
ही मिठी भुजङ्गाची, सर्वनाशि हा धन्दा.
वेळ जाय हा वाया, दाव अेकदा माया,
सिद्ध आहुती द्याया प्रेमशूर मी खन्दा.

---

## ७७ स्पष्टोक्ति

मी तुझ्यावरी कवनें गाअिलीं किती रचुनी,
त्यांतलें रहस्य कसें ना कळे तुला अजुनी ?
काव्यरीति तू रतविशी, गूणदोष दाखविशी,
ठेविशी परी कविशी वृत्ति हाय काय सुनी !
रम्य चारु रूप तुझें अेक सौख्य दे, न दुजें;
शान्तवी तृषा न परी जेवि अम्बरस्थ धुनी.
तारकाच तू गमशी वा सुधांशुसिन्धु शशी,
मी मनुष्य, तार मशी, मी न देव, मी न मुनी.
गाअिलीं किती कवनें, लोटलीं किती अयनें,
नीट ही पहा अजुनी प्रीति खोल सन्थ जुनी.

---

## ७८ तुझी निष्ठुरता

निष्ठुरतेमुळे तुझ्या काळिज हें दुभङ्गलें,
दोषच काय की तुझ्या हें प्रणयांत रङ्गलें ?
जाणुनि तू जिवास या सुन्दरतेंत गोवुनी
मोकलितां पुन्हा तुझें चित्त न कां विशङ्कलें ?
आळविलेंस सुन्दरी, खेळविलेंस हृत्सरीं,
आणिक काय सत्वरी त्वन्मन हाय रन्जलें !
जीव तुलाच भाळला, कां वनवास हा मला ?
आवडतीं विरक्तिला निर्जन घोर जङ्गलें.
प्रेम जुनें तुटेच ना, आसहि कां सुटेच ना ?
गुप्त असह्य वेदना देशि सदैव चञ्चले.
सुन्दरतेंत सापडे प्रेम म्हणून का नडे ?
अन्ध कसा बनूं गडे हे मधुरङ्गमङ्गले ?
शब्दहि तू न ऐकशी, दृग्शरही न फेकशी,
आळवणी करूं कशी ? हाय जिणेंच सम्पलें !

---

## ७९ मोतियाचा गजरा

मोतियाचा सतेज हा गजरा,
चेहरा यापरी करा हसरा.
म्हणतां कां फुरङ्गटूनि अशा,
' मानभावी, तुम्ही दुरीच सरा ! '
काय थट्टा नको ? नको सलगी ?
मधुभाषाहि का दुरूनि करा ?
दग्धचित्तीं कुठूनि भाव नवा ?
केवि येई रणीं नवीन झरा ?

ठरलां का अभागिनी, वेड्या ?
यापुढे ना दिवाळि ना दसरा ?
काय हा राग ! छे दिसे अुसना,
काय रागांत गोड हो नखरा !
मृग नेत्रांतुनी अता वरसे ?
प्रमदांची खरी विचित्र तऱ्हा !
तूच ना भग्न चित्त सान्धियलें
आणुनी या भिकारियास घरा ?
दग्ध होताच हृत्प्रदेश तदा,
भाव-पीकासही तसाच वरा.
मग जाअूं ? कशास राहुं अिथे ?
भाव माझा तुला गमे न खरा ?
नित्य माझीच गे गळोत टिपें,
चिम्बवीशी कशास तू पदरा ?
जीवघेणी अशी कशी थट्टा ?
संव्शयाचा नकोच वास जरा.
ये अशी ! यास हात लावुं नको
मीच बान्धीन हा अता गजरा.

---

## ८० प्रेम-सम्भ्रम

मूर्ति तुझी देखतांच मी पडलों सम्भ्रमीं,
पूर्ण शशी ये अखेर काय हृदींच्या तमीं !
काय करूं भावसिन्धु अुत्सुक हेलावतां,
यौवन हें भावभूत, होय न आशा कमी.
हा नखरा, हा कटाक्ष आग न लावील कां ?
अन्ध न मी, मी पिसा न, मी न चतुर्थाश्रमी.
मादक केवी अुरोजवैभव अुत्फुल्ल हें !
केश न आजानु, पाश गन्धित हे रेशमी.
हास्य तुझें खोडसाळ, राग तुझा लाघवी,
चारुचमूव्यूह थोर, काय करूं अेक मी ?
मी न करीं व्यर्थ झुन्ज, तूच हवें तें करी,
स्वर्गमहीराज्य हेंच, मी पथ अैसा क्रमीं.
कां म्हणशी, हे प्रलाप, संय्यम कां तूटला ?
अेक शुक्राचार्य मात्र या जगतीं संय्यमी.
जाण गडे, पाहिजेस तूच मला सङ्गतीं,
की विरहीं तूजवीण मी तर नित्य श्रमी.

---

## ८१

दृष्टि तुषां फेकतांच देह हलेना,
चित्त चळेना तथापि रोख कळेना.
प्रेम-पिसा होय, जाय तो नर वाया,
शास्त्र कळूनीहि हाय काहि वळेना !

---

मराठी ग्रंथ सं...

८२

काय करूं यापुढे प्रेय कुठे नातुडे,
शोक वृथा बापुडे प्रीतिविणे बुडबुडे.
ही भरली सम्पदा वाहुं कुणाला वदा,
दैन्य बघूनी असें जीव सदाचा कुढे.

---

८३

अूठ अूठ, नदीकाठ पाहुं सर्व फिरूनी
काळ मागिल आणूनि त्यांत जाअुं विरूनी.
बैसतेस अुदासीन, आणि केवि तदा तू
गोड हासत हें चित्त घेतलेंस हिरूनी!

---

८४

रसोदात्त भावगीत रचूनी तुझ्यावरी
क्रमीं तेंच तें म्हणूनि सख्या, मी विभावरी;
अुठे तों मधे प्रतिध्वनि माझाच, अैकतां
चपापूनि मी बघें कशि आशाळु बावरी!

---

८५

हा कसें गौरविलें कुठे कुठे मी तुजला,
स्तुतीमुळे जीव तुझा कळे न हा कां बुजला?
दुरी दुरी राहशि तू; न शब्दही बोलशि तू,
वनीं फिरें ढाळित मी पदोपदीं अश्रुजला.

---

## ८६ आओीची आठवण

प्रेमस्वरूप आओी! वात्सल्यसिन्धु आओी!
बोलावुं तूज आता मी कोणत्या उपायीं?

तू माय, लेकरूं मी; तू गाय, वासरूं मी;
ताटातुटी जहाली आता कसें करूं मी?

गेली दुरी यशोदा टाकूनि येथ कान्हा,
अन् राहिला कधीचा तान्हा तिचा भुका ना?

तान्ह्यास दूर ठेवी—पान्हा तरीहि वाहे—
जाया सती शिरे जी आगींत, शान्त राहे;

नैष्ठुर्य त्या सतीचें तू दाविलेस माते,
अक्षय्य हृत्प्रभूचें सामीप्य साधण्याते.

नाही जगांत झाली आबाळ या जिवाची,
तूझी उणीव चित्तीं आओी, तरीहि जाची.

चित्तीं तुझी स्मरेना काहीच रूपरेखा,
आओी हवी म्हणूनी सोडी न जीव हेका.

विद्याधनप्रतिष्ठा लाभे अता मला ही,
आओीविणे परी मी हा पोरकाच राहीं.

सारें मिळे परन्तू आओी पुन्हा न भेटे,
तेणे चिताच चित्तीं माझ्या अखण्ड पेटे.

आओी, तुझ्या वियोगें ब्रह्माण्ड आठवे गे!
कैलास सोडुनी ये अुल्केसमान वेगें.

किंव्वा विदेह आत्मा तूझा फिरे सभोती,
अव्यक्त अश्रुधारा की तीर्थरूप ओती!

ही भूक पोरक्याची होअी न शान्त आअी,
पाहूनिया दुज्यांचें वात्सल्य लोचनांहीं.
वाटे अिथूनि जावें, तूझ्यापुढे निजावें,
नेत्रीं तुझ्या हसावें, चित्तीं तुझ्या ठसावें !
वक्षीं तुझ्या परी हें केव्हा स्थिरेल डोकें,
देअील शान्तवाया हृत्स्पन्द मन्द झोके ?
घे जन्म तू फिरूनी, येअीन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही अेक आस मोठी !

---

## ८७ बाळ-राजा

आनन्दकन्द लोकीं हा शाहु बाळ-राजा,
पाहूनि यास शोकीं अुल्लास होय ताजा.
अन्धार गाढ भोंती, चिन्ता परी नको ती,
हास्यप्रभेस ओती हा बाळचन्द्र माझा.
हा जातिवन्त छावा, आशेस हा विसावा,
साधूनि दुष्ट दावा दैवा, सुखें अता जा.
हा बन्दिवास याचा राहील का सदाचा ?
हा वीर सङ्कटांचा ठेवील का मुलाजा ?
स्वत्वास जिङ्कणारा, राष्ट्रास तारणारा
फोडूनि हाच कारा येअील राष्ट्र-काजा.

---

# ८८ अज्ञात नाथास

आहेस तू जगीं हें खोटें खरें न ठावें.
नाथा, तथापि तूतें मी वाहतें स्वभावें.
येशील का कुठूनी केव्हा कसा कळेना,
मी जागच्याच जागीं शोधीत तूज धावें.
स्वर्गातुनी मनाच्या घे स्रोत भावगङ्गा,
अन् ही सदाशिवाच्या शीर्षींच शान्ति पावे.
जाऊनि दूर राया, लोपे मनीं न माया,
काषायवेष का या हृत्सङ्गिनीस भावे?
भाण्डार लूटवाया केले प्रयास वाया,
सौभाग्य अन्तरींचें वाढे तुझ्या प्रभावें!
प्रीतीच ज्योत ज्याची तो दीप जन्म माझा,
गाभारियांत तूझ्या नन्दादिपें जळावें.
काळीज धुग्धुगे तों कर्तव्य हें टळेना,
अन् गात गात व्हावें हेंही तुझ्याच नावें.
जात्याच दुर्बला मी, मग्दूर काय माझा?
स्वामी, धरूनि हातीं वेडीस चालवावें.
कोठे घरीं, वनीं वा दर्यावरी, रणीं वा,
सामीप्य गाढ तूझें चित्तीं सदा पटावें.
येवो अथाङ्ग पाणी, वारा असो तुफानी,
जावो पुढेच तारूं, बैसोत हेलकावे!!
कान्ती तुझ्या स्मिताची सञ्जीवनीच माझी,
रे, मृत्युभीति चित्तीं प्रीतीसवें न मावे.

---

# ८९ बेगमेचें विरहगीत

जमल्यास आज तारा अथवा खुशाल मारा,
तुमच्याशिवाय थारा मजला कुठे अदारा ?
प्रभु थोर या जिवाचे, महिमा महींत गाजे,
हृदयीं अखण्ड वाजे तुमचाच हा नगारा.
विभवीं तुम्ही लपावें, अपुल्यामधे रमावें,
तुमच्या परन्तु नावें जगीं कारभार सारा.
रुसलां जहाँपन्हा कां ? किति वेळ मारुं हाका ?
बनवा अमेस राका, नलगे तुम्हां अिशारा.
उपभोगवस्तु नाना तुमच्याविना वृथा ना ?
मग या पहा जनाना मज हो असह्य कारा.
वनभूमि ही दिसे की पसरी कलाप केकी !
फुलवा कटाक्ष-सेकीं हृदयांतला सहारा.
सुकुमार पुष्प-शेजीं, विरहीं न शान्ति दे जी,
झळ काय हाय ये जी ! कुठला सुगन्ध-वारा ?
जगतीं तुम्हीच गाजी, न तुम्हांस कोण राजी ?
तुमचीच मी नमाजीं करितें दुवा उदारा !

---

अमा = अमावास्या. राका = पौर्णिमा. केकी = मयूर.

## १० अक्षय्य लागणी

विद्युल्लतेप्रमाणे हासूनि साजणी,
अन्धार गर्दवूनी जाशी पुन्हा क्षणीं.
रस्ता पुढे दिसेना अन्दाज होअिना,
हा जीव पाठलागीं मी लाविला पणीं.
मागें न येअुनीही जाणार मी कुठे ?
खेचूनि ने, न सोडी तूझी भुलावणी.
ठेचाळतां उठूनी जाअींच मी पुढे,
रात्रींहि पापणीला लागे न पापणी.
घेअूं कुठे विसावा ? रस्ता अनन्त हा,
थाम्बूं तरी कसा मी ? अक्षय्य लागणी !
अैशी लपाछपी तू खेळूं नको गडे,
राहीं ध्रुवापरी तू—ही अेक मागणी.

## ९१ प्रेमाची शिक्षा

तू भासलीस मागे काव्यात्म सारजा,
तू वाटशी निषादी गौरी नगात्मजा.
जातां खिळूनि जागीं त्वद्रूप पाहुनी
तू विन्धिलें कटाक्षें सम्मूढ सावजा.
आधी करूनि त्याला घायाळ कां अता
खोचूनि साङ्गशी की आहेस मुक्त, जा !
गेले तुटूनि सारे सम्बन्ध मागले,
वक्रोक्तिने कशाला देशी अता रजा ?
मार्जार मूषकाशी जो खेळ खेळतें,
खेळांत त्याच का गे वाटे तुला मजा ?
हा योगधर्म साङ्गे, प्रेमस्वरूप जें,
त्यागूनि अर्थ सारे त्यालाच या भजा.
येऊनि अन्तरूमीं प्रेमांत मी पडें
हा का गुन्हा म्हणूनी देशी मला सजा ?
हे हालहाल आता झाले न का पुरे ?
दे मोक्ष एक घावें छेदूनि काळजा !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. २०७७
ता. ८-१२-३३
ठाणे.

## ९२ प्रमद्वरा

सौभाग्यसुन्दरी, गेलीस कां त्वरें !
पाहूं कुठे तुला काव्यात्म अप्सरे ?
ये रङ्गपञ्चमी, कां गे वियुक्त मी ?
मी कां पडूं तमीं, हृज्ज्योत तू बरें !
अन् पुष्पवैभवीं सृष्टी दिसे नवी,
स्वर्गास खेव दे सृष्टि स्वयंव्वरें.
ही गूढ लागणी तूतेच साजणी,
हाकारिते वनीं पाही पिकस्वरें.
स्वर्गीय ताप हा जाळी मला पहा,
आशाच सोडिली माझी भिषग्वरें.
सञ्जीवनी तुझ्यापाशी असूनिही
जावें मरूनि का मी मोहनज्वरें ?
सौन्दर्यनन्दिनी, तू सर्व जाणशी,
नैष्ठुर्य का तुला शोभे प्रमद्वरे ?

## ९३ जुगारी

गोरी सलील सुन्दर तू भेटतां कुमारी
वाटे भर्वी अजूनिहि आहे जरा खुमारी.
दैवें दगा दिला जरि कित्येकदा तयाला
अन्तीं कुबेर होअिन मानी मनीं जुगारी.
मी धाडशी सदोदित लावीं पणास सारें,
आशेवरी विसम्बुनि हातांतलें झुगारीं.
स्वप्नांवरी तरङ्गत गुङ्गींत जन्म जाओ;
निश्चिन्त मी असावध, फुङ्को कुणी तुतारी!
हो स्वर्गलाभ भूवर, हो सर्वनाश किंव्वा,
माला पडो शिरावर किंव्वा पडो कुठारी!
जाती सुवर्ण-मध्यम-पन्थेंच हे शहाणे,
प्रेमांत हेंच केवळ सौभाग्य—बेसुमारी?
तूझें घडूनि दर्शन मी प्रेममत्त झालों,
वैराग्य केवि आदरुं? का प्रेम हें न तारी?
राजर्षि तोहि मोहित हो मेनका-कटाक्षें,
तूझ्यापुढे टिके नच ही पुस्तकी हुशारी!
जाळ्यांत येअि सावज हा दोष आमिषाचा,
दोषास पात्र या तव सौन्दर्यजादुगारी.
राजर्षि घालवी तप, कोणी मुके जिवाला,
सर्वस्व ठेविलें बघ मीही तुझ्या पुढारीं.
हे चारुगात्रि, भीति न होओील काय याची;
हे देवते, तुझी कृति होअील चारु सारी.

# ९४ पुजारी

अव्याज आणि राजस तू भेटतां कुमारी
हो शान्त भाव अन्तरिं माझा पिपासु भारी.
आलों चढूनि डोङ्गर तों नेमकी पुढे तू!
मी श्रान्त पान्थ आणिक तू सावली दुपारीं.
पूर्वी किती मनोरथ घाटांत चूर झाले,
मी थाम्बलों न कीं जागिं आशा जिगीषु तारी.
मी शैलजा म्हणूं तुज का क्षीरसिन्धुकन्या ?
का चन्द्रिकाच जी स्थित हो पुष्पवत् तुषारीं ?
झालों त्रिदण्डि तूजच धुण्डावया सुभद्रे,
गे अैक सत्य भाषण हें भावनानुसारी.
ही प्रीति दे मला तव हातांत देवते गे,
"सा मामनुव्रता भव!" बोलेल का पुजारी ?
तेढा कुरूप मी मज सारल्य, चारुता दे,
कुब्जेस दे अलौकिक लावण्य तो मुरारी.
आशा सदैव चञ्चल, हीते विराम दे तू,
स्वीकारुनी सखे, मज वेडयास या सुधारी.
जीवास दर्शनें तव आनन्द-शान्ति लाभे,
आता हरूनि तू मज दे काम्य-मोक्ष चारी.

# ९५ क्षमस्व

आता न कां रुचे तुज ही प्रीति भावडी ?
चित्तांतली अजूनिहि जाओी न कां अढी ?
माणूस केवि राहिल गे नित्य शाहणें ?
कां राखिशी अुरीं गत कालांतलीं मढीं ?
दे त्यांस अग्नि या अनुतापांत माझिया,
तप्ताश्रु-सङ्गमीं बघ हा पूर चौथडी !
गेले किती वसन्त नि हेमन्त लोटुनी,
अद्यापि होय आठव तूझा घडी घडी.
रागांत अन्त का मम तू पाहणार गे ?
देवि क्षमस्व ! धावुनि ये, सोड फू·गडी !
होतोंच ना तुला प्रिय अत्यन्त अेकदा ?
ध्यानांत आण तो क्षण, दे भेट तातडी.
झाला असे पुरा शनिफेरा, अता तरी
ती होअुं दे पुन्हा युति, कां ठेविशी अढी ?

---

शनिफेरा=साडेसात वर्षांचा अवधि.

## ९६ दिनान्त

येतां दिनान्त सन्निध येती न त्या झळी,
वाहे हवा सुखावह, आराम या स्थळीं.
या वायुवीचि शीतल लीलेंत नाचती
कैशी सरित्तनूवर गुम्फीत साखळी !
घाटास चुम्बितां जळ वाजे डुबुक्-डुबुक्,
खुण्टावल्या तरी हळु हेलावती जळीं.
पोचेल दृष्टि तोंवर तापीपलीकडे
शिन्दी रसाळ आणिक त्या रुक्ष बाभळी.
निम्बोणि आणि सूक्ष्मसुगन्धी शिरीष हे,
यांच्यावरी उभ्या धरिती छत्र नारळी.
बाळें तजेल ज्यांवर सानन्द खेळती
ते गालिचेच का मऊ दाबीव हिर्वळी !
हे पोपटी तृणाङ्कुर नाजूक का जणूं
काश्मीरचीच लोकर अन् तीहि जावळी !
प्यायास नारळी पय पेल्यांत सृष्टिच्या,
खायास साखरेपरि हीं मोह-शाहळीं.
गप्पास काव्यशास्त्रविनोदी असे सखे,
गायास कण्ठ सुस्वर अन् गजलाञ्जली.
खेळावया मनोरम सेना सभोवतीं,
खेळाडु आणि चौकस ही बाळ-मण्डळी.
येतां निशा हळूहळु जाऊं कुणी कुठे,
आरक्त या क्षणीं तरि ये मौज आगळी.

---

तरी = होड्या. जावळी ( < जावळ ) = पहिल्या कापणीची.

## ९७ वियुक्त-विलाप

जातां टळूनि आवस वाढेल हृच्छशी,
आशेस तों करी हत काळी चतुर्दशी.
ही चन्द्रकोर ये रुचि आणावया तमीं
लोपूनि अल्पकालच तेजांत आवशीं.
वर्षर्तुचन्द्रिकेपरि होऊनि संस्मृती
आता सरीवरी सर वर्षे निशा मशी.
कैलास पाहण्यास्तव गेलीस चित्कले,
ठेवूनि गाढ मागुनि अन्धार मानसीं.
उल्का नभास सोडुनि घे झेप खालती,
ज्योतिष्पथास दावुनि लोपे पुन्हा जशी,
सोडूनि तू तशी मज गेलीस राजसे,
गेली त्यजूनि ज्यापरि ऐलास उर्वशी.
भ्यावेंस तू जळीं तुज नेल्यास मी बळें,
अव्यक्तसागरीं तर घेशी उडी कशी ?
पूर्वी जरी मनोरम थट्टेंत वञ्चिलें,
क्रौर्यें कधी न यापरि तू पाडिलें फशीं.
धर्मार्थकामसाधन केलें समागमें,
कां एकटी पुढे द्रुत मुक्तीस पावशी ?
स्वर्गी परी सुनें तुज वाटेल ना सखे,
पृथ्वीवरी तुझ्याविण वाटे जसें मशी.

---

रुचि = तेज. आवस = अमावास्या. ऐल = पुरूरवा.

## ९८ सृष्टि-वैभव

हें काय सृष्टिवैभव चौफेर सारिखें !
हो दृष्टि शान्त पाहुनि पाचूच की पिके.
रत्नें कितीहि धारण सम्राट् करो शिरीं,
अैश्वर्य शैल निर्दय तें यापुढे फिकें !
सृष्टी कुटुम्बवत्सल केवी कृतज्ञ ही !
कर्दा खपूनि कष्टुनि लागे परी भिकें.
स्वातन्त्र्य-सौख्य-तेज न याच्या मुखीं दिसे,
अैदी तथापि नागर अैटींत हे निकें.
सर्वत्र हाय कोन्दट माजे प्रशान्तता !
स्तोत्रें पढीक यद्यपि गातीं शुकादिकें !
भू, फार भार होअुनि कोपूनि कम्पतां
होती अनर्थ, मानव अद्यापि ना शिके.
अुल्हासपूर बाहिर रानींच ये अिथे,
गावें सदैव राहुनि अव्यक्त का पिकें ?
ये, सृष्टिचेंच वैभव हें साठवूं हृदीं,
तू मी गरीब, रङ्गहि हा का सदा टिके ?

---

कर्दा = शेत कसून पिकविणारा.

# ९९ काहूर

हें काय असें होओी ! साशङ्क धपापे अूर् ,
डोळ्यांत जमे पाणी, डोक्यांत अुठे काहूर् .
अेकान्त गमे ठेवी छातीवरती ओझें,
अन्धार फिरे भोंती, गेला दुनियेचा नूर् ,
स्वारस्य न तें राही, हो लुप्त जिगीषा ही,
नैश्चित्य नुरे काही, गेलाच गमे मग्दूर् .
मी गीत कसें गाअूं ! स्फूर्तीस कुठे पाहूं !
भेसूर जगामाजीं कोल्हाळ अुठे बेसूर.
पाणी न कुठे साचे, हा जीव कसा वाचे !
वाळूनि मदाशांचे जातात पहा अङ्कूर् .
हृत्सङ्ग तिचा किंवा मृत्यूच मिळो जीवा—
थाम्बेल कधी काळीं त्यावीण न ही हुर्हूर् .

## १०० दीननाथा !

कां दया ये न तूतें दीननाथा दयाळा ?
कां मला आडरानीं टाकिशी लोकपाळा ?
यौवनाच्या मदानें पाडिली भूल मागें,
आणि मात्रासुखांचा जाय लागूनि चाळा.
ती अहन्ता गळाली, मोहनिद्रा पळाली,
आत्मविश्वास गेला, दैन्य आलें कपाळा.
मत्त होतों मदानें मी गजेन्द्राप्रमाणे,
झोम्बतो नक्र पायीं, मार या क्रूर काळा !
नन्दपत्नीस कान्हा, मी तसा तूज तान्हा;
हट्ट घेऑं तुझा मी, राहशी का निराळा ?
ही मिठी घट्ट तूझ्या मारिली आज पायीं,
माउली, घे कडे घे मूढ लाचार बाळा !
झांकितां पल्लवें तू क्षीण या तान्हुल्याला
जाच ना दे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा.
तू जणू क्षीरसिन्धू, दे मला अेक बिन्दू;
दाविशी कां बळें तू अन्तरींचा अुमाळा ?

# १०१ प्रार्थना

कुणाला कुणी निर्मिलें आणि केव्हा,
तुवां मानवाला, तुला मानवें वा—
करो गूढ हें मूढ त्या तार्किकाला,
स्वयें वन्दितें भावना तूज देवा.
विराटापुढे काय ताठा अणूचा ?
रजाचा रवीच्यापुढे काय केवा ?
कधी भीतिने स्वार्थ साधावयाही
कराया तुझी धावतों साव-सेवा.
कधी वन्दितों अग्निसूर्यादि तेजें,
नि तीर्थें कधी—जान्हवी, सिन्धु, रेवा.
कधी नेणुनी रूप तूझें अगम्या,
तुला अर्पितों मानवाच्या अवेवां.
नको भीति वा वासनाक्रान्ति आता,
कुठे शान्ति, निर्वाण ? दे तोच ठेवा.
तुझ्यासङ्गती कर्मयोगी करी रे,
कुणालाहि दे स्वर्ग, वाटो न हेवा.

---

अवेव = अवयव.

# १०२ आव्हान

पुरे पुर्वजांच्या जयांची वढाअी !
पहा आज ही भोवतीची लढाअी.
नसे आसरा, आस निवृत्ति-कोनीं,
कुठे टाळुनी मृत्युला मर्त्य जाअी ?
तुम्ही मेण्ढरें मूक होतां म्हणूनी
बने भ्याड हा काळ कट्टा कसाअी !
धजे तो जगे, पाल तो जीविताला;
उठा वीर हो, दाखवा हातघाअी.
मरा आणि जा कीर्तिच्या दिव्यलोकीं,
जगा आणि भोगा जगीं पातशाअी.
जगे मात्र जो बापुडा दीन दास्यें
न त्याचें कवी गौरवें गीत गाअी.
नका अल्पसन्तुष्ट राहूं, प्रभू व्हा !
भिकारी न व्हा, माल नावेंच सांअी.
जया ध्येय चित्तीं, तसें तेज अङ्गीं
तयाच्या यशाला न कोठे मनाअी.
नको काय विद्या, कला आकलाया
कवाअीत पाश्चात्य अन् कारवाअी ?
झटा स्वीय कार्यीं, गुणोत्कर्ष साधा,
पुढे व्हाल सेनापती, व्हा शिपाअी.
शिवाजी पहा थोर राजा मराठी.
करी राष्ट्रसंस्थापनीं कारवाअी.
मनीं बाणुं द्या ती जिगीषा तयाची
पुढे व्हावयाला प्रतापी सवाअी.

---

## १०३ भाविक हुरहूर

असो देव किंव्वा नसो, कां बरें
तया वाचुनी जीव हा घाबरे ?
  जसें साण्डलें मूल चोहीकडे
बघे होउनी कावरें बावरें,
  तसें कां मला होय ? येथे पहा
न थोडे मला सोयरे-धायरे.
  मला लागणी गोड लागूनि कां
स्फुरे प्रार्थना, " ईश्वरा, धाव रे ! "
  फुलें गोजिरीं दों दिसांची—कसा
सुखी गन्ध त्यांच्या स्मितांचा भरे !
  हवा कापिती पङ्ख मारीत ती
कशी गोड निष्काळजी पाखरें !
  नभांतूनि, तारे जिथे कोन्दले,
कसा लोचनानन्द हा पाझरे !
  कसे कृष्णपाषाणभेगांतुनी
खळाळूनि येतीं रुप्याचे झरे !
  फुले, पक्षि, तारे, झरे—हे प्रभो,
तुझें वेड यांना जडे का खरें ?
  नराला तुझ्यावीण नाही गती,
असें कोणतें पाप केलें नरें ?

## १०४ चाळवणूक

असे यौवनीं केस कां पाण्ढरे ?
हृदीं प्रीतिची वासना वावरे.
कुणाच्या मुळे लागती स्पष्ट हे
कपाळीं हृदींचे दिसाया घरे ?
जगीं चारुतेची करी दुर्दशा
अशी कोण ती क्रूर भामा बरें ?
अशी मोहिनी अेक नाही कुणी,
म्हणूनीच सोत्कण्ठ मी वावरें.
मला व्यक्त मूर्तीत अेका दिसे
पुन्हा हाय तों भास वाया ठरे !
लपण्डाव चाले असा सारखा,
पुढे काय दैवीं कळेना खरें.
वरी कोण या शुभ्र केसांस अन्
क्षुधाक्रान्त या मन्द नेत्रांस रे ?
नसे भीति ती, यौवनान्तींहि कां
हृदीं प्रीतिची ही न वाञ्छा मरे ?

---

## १०५ प्रतीक्षा

क्र. ४०३९

गमे स्वामि, संव्सार सारा
तुझ्यावीण मिथ्या पसारा.
असो बाग काश्मीरचा ही
तुझ्यावीण वाटे सहारा,
पडो फूल अङ्गीं जुअीचें,
करी दंव्श जेवी निखारा.
वियोगीं प्रतीक्षेवरी मी
किती चालवूं रे गुजारा ?
वृथा पाहुं दारीं कितीदा ?
किती घालुं या येरझारा ?
तुला काय साङ्गूं मुखाने ?
पुरे का न तूते अिशारा ?
स्फुरे प्रीतिचें गीत चित्तीं,
कुठे तू परी अैकणारा ?
अुडे जीव हा प्रेमवातें
जणू की ध्वजाचा फरारा !

---

## १०६ सुन्दरीदर्शन

पाहतां सुन्दरी या पथीं मोद हो मानसाला अती.
काय सोल्लास अैटीमधे भीति सोडुनि या चालती !
तेज दावी मुखींचें नवें ज्योति चित्तीं कशी जागती.
राष्ट्रसंव्सारमार्गी अता भासते काय रम्यायती !
वाट अुत्कर्ष पाही गमे जन्म घ्याया पुन्हा भारती.

## १०७ अल्लाहु अक्बर्

ये राज्य कोणा, कोणा फकीरी,
ये दास्य कोणा, कोणा अमीरी,
कोणी शिकन्दर्, कोणी कलन्दर्—
अल्मुल्कु लिल्लाह् ! अल्लाहु अक्बर् !

हा दैववादी दैवा निखन्दी,
तो कर्म साधी, देवास वन्दी,
निर्द्वन्द्व कोणी योगी दिगम्बर्
बोले अनल्हक्क् !—अल्लाहु अक्बर् !

हा तर्कवादी शङ्कीत रङ्गे,
श्रद्धाळु तोही पृष्ठीं तरङ्गे;
नाना मतांचा गिल्ला भयङ्कर्—
अल्लाहु आलम् ! अल्लाहु अक्बर् !

बोला हवें तें—ब्रह्मास्मि ! अल्लख् !
सायुज्य जें दे तें ज्ञान सम्यक्.
भू, स्वर्ग किंव्वा पाताळ नश्वर्—
स्थायी प्रभू तो—अल्लाहु अक्बर् !

भङ्गूनि मूर्ती 'काबा' कशाला ?
सर्वत्र अल्ला, सीमा कशाला ?
स्रष्टा जगाचा जो अेक अक्षर्,
वन्दे तमेकम् ! अलाहु अक्बर् ?

अल्लाहु अक्बर्=ओश्वर सर्वश्रेष्ठ आहे. कलन्दर=बन्धनातीत भिक्षु—
अल्मुल्कु लिल्लाह्=राज्य ओश्वराचें आहे. अनल्हक्क्=सत्यमस्म्यहम्—
अल्लाहु आलम्=ओश्वर सर्वज्ञ आहे. अल्लख<अल्हक्क्=तत्सत्—

धर्मांत साची ही राष्ट्रभक्ती
दात्री यशाची ही सङ्घशक्ती,
सर्वत्र होवो राष्ट्रीय सङ्कर् !
ध्यायेत् स्वदेशम्! अल्लाहु अक्बर् !

गाजो जगीं या जी लोकशाही
तीचेच आम्ही याजी शिपाअी,
जिज्ञासु भिक्षू, आ·जन्म चाकर्
स्वानन्दसम्राट्—अल्लाहु अक्बर् !

येवो कुलीच्या नेत्रीं प्रभा ती,
कर्दाहि चालो काढूनि छाती,
लाभो खपे जो त्यालाच भाकर् !
वन्दे स्वकष्टम्! अल्लाहु अक्बर् !

दाता मिळो वा कद्रू मिळो वा,
टक्का मिळो वा धक्का मिळो वा,
ही तत्त्वनिष्ठा आम्हांस बक्कर्
अल्हाम्दु लिल्लाह्! अल्लाहु अक्बर् !

मराठी ग्रंथ संग्रहालय ४८३१ ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत क्र. नं. ता.

काबा=मक्का शहरांतील पूज्य मन्दिर. कुली=मजूर. कर्दा=शेतकरी.

## १०८ वासन्त अुषा

तुजवीण सखे, मज कोणि नसे,
प्रतिमाहि तुझीच हृदीं विलसे.
मी करीं पूजा तियेची भावपुष्पें वाहुनी,
आणि पुष्पें कोणतीं पूजेस अुञ्ची याहुनी ?
परि ती न कधीच बघे हसुनी
भिजवी न कधी मन शान्तिरसें.
सारखा अैसा अबोला मीववी भक्तास या,
केवि वारावें कळेना व्यापणाऱ्या संशया;
कर तूच दया, हस, वार भया.
बघ खोल हिमीं जिव केवि फसे.
बोल तूझा येअुं दे वासन्त वायूसारखा,
आणि आशेची अुषा ती फाकुं दे, अन्धार कां ?
प्रणयास वसन्तच रम्य सखा,
मग रङ्गुनि विश्व कसें विकसे !

REFBK-0004931
REFBK-0004931

। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।